सोमवार, ६ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १३९
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग

माथेरानमध्ये विदेशी पर्यटकांना प्रवेशबंदी/२
रेवदंड्यातील पोटनिवडणुकीत मतदारांमध्ये निरूत्साह/४
दुसर्‍या कसोटीवर भारताची मजबूत पकड/६

## राज्यात ‘ओमायक्रॉन’बाधित रुग्णांमध्ये वाढ



**मुंबई :** राज्यात आठ नवीन ओमायक्रॉन पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. यामुळे राज्यातील ओमायक्रॉनबाधित रुग्णांची एकूण संख्या नऊ झाली आहे. नव्याने आढळलेल्या रुग्णांमध्ये पिंपरीतील सहा आणि पुणे व आळंदीतील प्रत्येकी एका रुग्णाचा समावेश आहे. त्यामुळे डोंबिवलीपाठोपाठ आता इतर भागांतही ओमायक्रॉनचा शिरकाव झाला आहे. दरम्यान, विषाणूमध्ये बदल होणे ही नैसर्गिक प्रक्रिया असून याबाबत जनतेने भीती न बाळगता आपल्या नेहमीच्या व्यवहारात कोविड अनुरूप वर्तनाचा अंगिकार करावा, नागरिकांनी लसीकरण पूर्ण करावे आणि मागील महिनाभरात जे प्रवासी आंतरराष्ट्रीय प्रवास करून भारतात आले आहेत त्यांनीही आपल्याबाबत स्थानिक आरोग्य विभागास अवगत करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने सर्व जनतेला करण्यात आले आहे.

# शेकाप-राष्ट्रवादीत श्रेयवादावरून जुंपली!

## रायगडातील वाईट प्रवृत्ती नष्ट करायचीय; जयंत पाटलांचा सुनील तटकरेंवर निशाणा



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सध्या नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून यानिमित्ताने महाविकास आघाडीतील वाद उफाळून आले आहेत. अशातच माणगाव तालुक्यातील एका कार्यक्रमात शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी जिल्ह्यातील वाईट प्रवृत्ती नष्ट करण्याचे काम येणार्‍या काळात आपल्याला करायचे असल्याचे सांगत राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार सुनील तटकरे यांच्यावर निशाणा साधला. त्यामुळे महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये विकासकामांवरून श्रेयवाद सुरू असल्याचे पाहावयास मिळत आहे.

माणगाव तालुक्यातील राजिवली गावात विविध कामांचा उद्घाटन समारंभ शनिवारी (दि. ४) आमदार जयंत पाटील यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी त्यांनी खासदार सुनील तटकरे यांचे नाव न घेता टीकास्त्र सोडले. ते म्हणाले, राजीव साबळे बरोबर बोलतात. मी ज्यांना मदत करतो ते उलटे फिरतात. आज जिल्ह्यात वाईट पद्धतीचे राजकारण सुरू आहे. विकासकामांचे श्रेय घेतले जात आहे. बॅ. अंतुले यांनी कोकणात चांगले काम केले, पण त्यांनी ज्यांना मोठे केले त्यांनीच त्यांना संपवले.

अ‍ॅड. राजीव साबळे यांनी शेकापच्या कामांचा नारळ राष्ट्रवादी फोडते. नक्की काय चाललंय तेच समजत नसल्याचे सांगितले. प्रास्ताविकात शेकापचे तालुका चिटणीस रमेश मोरे यांनीही राष्ट्रवादी काँग्रेसवर हल्लाबोल केला.


या कार्यक्रमास माजी आमदार पंडित पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते नानासाहेब सावंत, अस्लम राऊत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### महाविकास आघाडीत सातत्याने बेबनाव

राज्यात सत्तेवर असलेल्या महाविकास आघाडीमध्ये शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस असे तीन प्रमुख पक्ष आहेत. याशिवाय रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाने आघाडी सरकारला पाठिंबा दिलेला आहे. असे असले तरी जिल्ह्यात या चारही पक्षांमध्ये वारंवार बेबनाव दिसून येतो. त्यांच्यातील कोण कुणाला लक्ष्य करेल हे सांगता येत नाही. त्यामुळे या पक्षांचे सर्वसामान्य कार्यकर्ते मात्र सदैव संभ्रमात असल्याचे चित्र आहे.

# राष्ट्रपती रामनाथ कोविंद आज किल्ले रायगडावर

## परिसराला छावणीचे स्वरूप | कडक पोलीस बंदोबस्त तैनात



(छाया : महेश शिंदे)



**महाड : प्रतिनिधी**

देशाचे महामहीम राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी सोमवारी (दि. ६) किल्ले रायगडावर येत आहेत. राष्ट्रपतींच्या दौर्‍याच्या पार्श्वभूमीवर किल्ले रायगड परिसराला छावणीचे स्वरूप आले आहे. पोलिसांनी गडाकडे येणार्‍या सर्व रस्त्यांवर नाकाबंदी केली असून कडक बंदोबस्त तैनात केला आहे.

शिवभक्तांच्या भावनांचा आदर करीत राष्ट्रपती रोप वेने रायगड किल्ल्यावर जाणार आहेत. राष्ट्रपतींचे दुपारी १२.१५ वाजता पाचाड येथे आगमन होणार असून त्यांच्यासमवेत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मंत्री आदित्य ठाकरे, एकनाथ शिंदे, जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे आदी असणार आहेत.

राष्ट्रपती राजदरबार येथील शिवप्रतिमेस अभिवादन करून समाधीस्थळाचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर दुपारी भोजन उरकून ३.२० वाजता दिल्लीला रवाना होतील.

राष्ट्रपतींच्या सुरक्षेसाठी किल्ले रायगड परिसरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलिसांकडून जागोजागी नाकाबंदी करून कसून तपासणी केली जात आहे.

# दिव्यांग व स्वमग्न मुलांच्या विकासासाठी समाजातील संवेदना जागृत झाली पाहिजे

## आमदार अतुल भातखळकर यांचे प्रतिपादन



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिव्यांग व स्वमग्न मुलांच्या विकासासाठी समाजातील संवेदना जागृत झाली, तरच खर्‍या अर्थाने त्यांचा उत्कर्ष साधला जाईल, असे प्रतिपादन आमदार अतुल भातखळकर यांनी रविवारी (दि. ५) खांदा कॉलनी येथे केले. सोपान संस्थेच्या शनय ऑटिझम रिसोर्स सेंटरचे उद्घाटन कांदिवलीचे (मुंबई) आमदार अतुल भातखळकर यांच्या हस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी ते बोलत होते.

खांदा कॉलनी सेक्टर ७ येथे झालेल्या या कार्यक्रमास सोपान संस्थेच्या विश्वस्त रूबिना लाल, शोभा श्रीवास्तव, व्यवस्थापकीय विश्वस्त संगीता मेहता, कोटक बँकेच्या सीआरएस विभागाचे उपाध्यक्ष हिमांशु निवसरकर, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती सभापती समीर ठाकूर, नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, नगरसेविका सीता पाटील, भाजप पदाधिकारी भीमराव पोवार, युवा नेते अभिषेक भोपी यांच्यासह पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

दिव्यांग, स्वमग्न यांच्या बाबतीत कायदे, नियम अमलात आले पाहिजेत. त्यासाठी प्रशासनाचा पुढाकार महत्त्वाचा ठरणार असून स्थानिक स्वराज्य संस्थेने किमान तीन टक्के निधी दिव्यांगांच्या विकासासाठी खर्च केलाच पाहिजे, असे सांगून आमदार अतुल भातखळकर म्हणाले की, स्वमग्न किंवा दिव्यांग असलेल्या मुलांच्या पालकांची व्यथा मोठी आहे. सतत चिंतेत त्यांचे आयुष्य असते. स्वमग्न, दिव्यांग वर्गाचे प्रश्न खूप आहेत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या जीवनाची घडी विस्कळीत झालेली असते. अशा परिस्थितीत सोपान संस्था पुढे येऊन त्यांना धीर देत आहे आणि ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे.

दिव्यांगांच्या गरजा ओळखून त्यांची काळजी घेतली पाहिजे यासाठी पंतप्रधानपदाची धुरा हाती घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी मोठ्या वास्तूमध्ये दिव्यांगांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. त्यामुळे दिव्यांगांना मोठा दिलासा मिळाला आहे, असेही आमदार भातखळकर यांनी नमूद केले. **(पान २ वर..)**

### सोपान संस्थेचे कार्य कौतुकास्पद -आमदार प्रशांत ठाकूर

*या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना प्रथम सोपान संस्थेच्या वास्तूचे आणि कार्याचे कौतुक केले. या संस्थेच्या माध्यमातून समाजाला प्रेरणा देण्याचे काम होत असून देवाचे आशीर्वाद संस्थेच्या पाठीशी आहेत. त्यामुळे वेळोवेळी या संस्थेला हितचिंतकांचा पाठिंबा मिळाला आहे. दुर्दैवाने ज्या मुलांना स्वमग्न व्याधी जडली आहे, त्यांच्या कुटुंबाची आर्थिक आणि मानसिक परिस्थिती बिकट होते. त्यांना आधाराची मोठी गरज असते. त्यांनी सामान्यपणे जीवन जगण्यासाठी ही संस्था काम करीत आहे. या केंद्रातून स्वमग्न मुलांच्या विकासासाठी मोठी मदत होणार आहे. त्यामुळे हे केंद्र पाल्य आणि पालक यांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरणार आहे.*

### बिबट्याच्या हल्ल्यात पाच जण जखमी

**अहमदनगर :** श्रीरामपूर शहरात भरवस्तीत बिबट्या शिरल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. ५) सकाळी १०च्या सुमारास घडली. मोरगे परिसरात खेळणार्‍या लहान मुलांसह पाच जणांवर या बिबट्याने हल्ला केला.

जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, शहरात धुमाकूळ घालणार्‍या बिबट्याला वनविभागाचे अधिकारी आणि श्रीरामपूर पोलिसांनी एकत्र येत पकडले.

# साहित्य संमेलनाला गालबोट

## ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर यांच्यावर शाईफेक



**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक येथील साहित्य संमेलनाला रविवारी (दि. ५) तिसर्‍या आणि शेवटच्या दिवशी गालबोट लागले. ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक गिरीश कुबेर यांच्यावर संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी शाईफेक केली. संभाजीराजांचा अपमान करणारे पुस्तक लिहिल्याचा आरोप कुबेर यांच्यावर करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे.

गिरीश कुबेर यांनी लिहिलेल्या ‘रेनेसान्स-दी अनरिटन स्टोरी ऑफ द मेकिंग ऑफ महाराष्ट्रा’ या पुस्तकातील काही भागांवर आक्षेप असल्याची भूमिका संभाजी ब्रिगेडकडून घेण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर हा हल्ला करण्यात आल्याचे खुद्द संभाजी ब्रिगेडचे नितीन रोटे-पाटील यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले. कुबेर हे संमेलनस्थळी दाखल होत असताना हल्ला करण्यात आला. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.






# मविआ सरकार फार काळ टिकणार नाही -आठवले

**लोणावळा : प्रतिनिधी**



राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार फार काळ टिकणार नसल्याचा पुनरुच्चार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केला आहे. मुंबई महापालिका निवडणुका संपल्या की, मार्चच्या आसपास राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळेल, असे भाकीत आठवले यांनी केल्यामुळे तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

लोणावळा येथे पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्यानंतर मीडियाशी संवाद साधताना आठवले यांनी हे भाकीत केले आहे. महाविकास आघाडीची सत्ता फार काळ टिकणार नाही. त्यामुळे सत्तेसाठी मुख्यमंत्रीपद वाटून घेण्याचा फॉर्म्युला भाजप-शिवसेनेने अवलंबवावा. मुंबई महापालिका निवडणुकीनंतर मार्चच्या आसपास मविआ सरकार पडेल आणि भाजप सत्तेत येईल, असे आठवले म्हणाले.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि शिवसेना नेते संजय राऊत, आदित्य ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यावरही आठवले यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. सर्व विरोधी नेते एकत्रित येऊन आघाडी करू पाहत आहेत. शरद पवार आणि ममता बॅनर्जी आदी नेते त्यासाठी बैठका घेत आहेत, पण आम्हाला काही फरक पडणार नाही. नरेंद्र मोदींना सत्तेतून हटविणे हे कोणा येऱ्यागबाळ्याचे काम नाही, असे आठवले म्हणाले.

दरम्यान, महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने देशातील आंबेडकरी अनुयायांनी चैत्यभूमीवर गर्दी करू नये, घरूनच बाबासाहेबांना अभिवादन करावे, असे आवाहन आठवलेंनी या वेळी केले तसेच सर्व दलित संघटनांनी एकत्रित यावे, अशी सादच आठवले यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने सर्व आंबेडकरी नेत्यांना घातली. रिपब्लिकन पक्षाचा एकच अध्यक्ष बनवूयात. मी अध्यक्षपदासाठी इच्छुक नाही. आता मी एक पाऊल मागे आलोय, आपले ऐक्य दाखविण्यात आपण एकत्र येऊयात, असेही त्यांनी सांगितले.

# माथेरानमध्ये विदेशी पर्यटकांना प्रवेशबंदी

**कर्जत : बातमीदार**



**ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर माथेरान नगर परिषदेचा निर्णय**

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानमध्ये परदेशात धुमाकूळ घालत असलेल्या ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटमुळे माथेरान नगर परिषद अलर्ट झाली आहे. माथेरान पालिकेने येणाऱ्या सर्व पर्यटकांचे स्क्रिनिंग करण्यास सुरुवात केली असून रविवारी (दि. ५) तीन परदेशी पर्यटकांना शहरात प्रवेश न देता माघारी पाठवण्यात आले.

ओमायक्रॉनचा संसर्ग परदेशातून येणाऱ्या नागरिकांमधून होण्याची भीती टास्क फोर्सने वर्तवली असून आंतरराष्ट्रीय विमानामधून येणारे पर्यटकांची तपासणी केली जात आहे आणि त्यांना ओमायक्रॉनची लक्षणे नसली, तर सात दिवस होम क्वारंटाइन करण्याचे आदेश आहेत. राज्य सरकारकडून सर्वत्र नवीन नियमावली बनवून ओमायक्रॉनबद्दल सरकारने घेतलेल्या भूमिकेबद्दल रायगड जिल्हाधिकारी यांनी पर्यटन स्थळ असलेल्या शहरांना गावांना सजग केले आहे. त्यानुसार माथेरान शहरात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांची स्क्रिनिंग करूनच आता पाठवण्याचे निर्देश गिरीस्थान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी दिले आहेत. त्याची कडक अंमलबजावणी पालिकेच्या आरोग्य विभागाकडून केली जात असल्याची त्यांनी दिली आहे.

यानुसार दस्तुरी नाका येथील या स्क्रिनिंग कार्यपद्धतीमध्ये माथेरान पालिकेच्या पथकाला तीन पर्यटकांना माथेरान शहरात प्रवेश देता आला नाही. रविवारी माथेरानच्या दस्तुरी नाका येथे मुंबई येथून प्रवासी कारने तीन परदेशी पर्यटक आले. त्यांच्याकडून आरटीपीसीआर टेस्ट केली असल्याबाबत टेस्टचा अहवाल मागण्यात आला, मात्र २ डिसेंबर रोजी जपान देशातून मुंबई विमानतळावर पोहचलेल्या त्या तीन जपानी पर्यटकांकडे दोन दिवसांपूर्वीचा किंवा त्याआधीचा आरटीपीसीआर टेस्टचा अहवाल नव्हता. मुंबईत तीन दिवस राहून हे पर्यटक माथेरान येथे आले होते. या तिन्ही जपानी पर्यटकांचे लसीकरण झाले होते आणि त्यांच्यामध्ये कोरोना संबंधी कोणत्याही प्रकारची लक्षणे दिसून येत नव्हती. तरीदेखील आरटीपीसीआर टेस्टचा अहवाल त्यांच्याकडे नसल्याने त्या पर्यटकांना शहराची सुरक्षितता आणि नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन शहरात प्रवेश दिला नाही, अशी माहिती नगराध्यक्ष प्रेरणा सावंत आणि पालिका मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांनी दिली.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज खारघरमध्ये परिसंवाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोमवारी (दि. ६) खारघरमध्ये सकाळी १०वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरचा भारत यावर परिसंवादाचे आयोजन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

खारघर सेक्टर १९ येथील सिद्धार्थ मल्टिपर्पज रेसिडेंट हायस्कूल येथे होणाऱ्या या परिसंवादात डॉ. शुभाशु भालाधरे, लोकसाहित्याचे अभ्यासक एन. एल. सूर्यवंशी आदी प्रमुख वक्ते असणार आहेत. आंबेडकरी चळवळीला स्मारके आणि प्रतिकांच्या भावनिक प्रश्नांच्या सापळ्यातून बाहेर काढून मागास समाजांच्या ज्वलंत प्रश्नांवर लढायला सिद्ध करणारा २७ कलमी एक अजेंडा सोमवारी महापरिनिर्वाण दिनी 'आंबेडकरी संग्राम'तर्फे चैत्यभूमीवर प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यानंतर राज्यभरातून येणाऱ्या आंबेडकरी जनतेच्या हाती तो अजेंडा दिला जाईल, अशी माहिती आंबेडकरी संग्रामचे अध्यक्ष डोंगरगावकर यांनी दिली.

सीबीडी येथील धम्मदीप सामाजिक संस्थेच्या विद्यमाने आयकर कॉलनी येथील समाज मंदिर हॉल येथे सकाळी १० वाजता बौद्धाचार्य सूर्यकांत बोधी यांच्या उपस्थितीत महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात येणार असल्याचे समाजसेवक सुभाष गायकवाड यांनी सांगितले, तसेच तुर्भे नाका हनुमान नगर येथील धम्मदीप बुद्धविहार समितीचे संस्थापक अध्यक्ष कामगार नेते प्रदीप वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी महापरिनिर्वाण दिनी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन उपासिका रतन काशीद, उपासक विनोद पाचपिंडे, विजय गायकवाड यांच्या उपस्थितीत होणार आहे. या वेळी त्रिशरण, पंचशील धम्मपूजा पठण होणार असल्याचेही प्रदीप वाघमारे यांनी कळवले आहे.

# नवीन पनवेलमध्ये शिंपी समाजाचे स्नेहसंमेलन

## आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती; पुरस्कारांचे वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्षेत्रिय आहेर शिंपी समाजाचे स्नेहसंमेलन नवीन पनवेलमध्ये रविवारी (दि. ५) आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




पृथ्वी हॉलमध्ये झालेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या वेळी समाजाच्या वतीने संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या राष्ट्रीय एकात्मता विचारांचा व कार्याचा प्रसार करण्याच्या हेतूने नामदेव महाराजांच्या मंदिरासाठी सिडकोच्या अखत्यारीतील सामाजिक राखीव गटातील भुखंड मिळावा, अशी मागणी करून या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन देण्यात आले.

या कार्यक्रमात डॉ. वैभव बोरसे, डॉ. मानसी बोरसे, डॉ. स्वप्नील बाविस्कर, डॉ. वैभव निकम, डॉ. वृषाली निकम यांच्या धन्वंतरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून, समीक्षा खैरणार यांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलच्या जडणघडणीमध्ये शिंपी समाजातील तरुण व नागरिकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले, तसेच समाजाच्या वतीने मंदिराच्या भूखंडासाठीची मागणी केली आहे. ती पूर्ण करण्यासाठी लवकरात लवकर सिडको अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले.

या स्नेहसंमेलनाला पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक बबन मुकादम, अखिल भारतीय क्षेत्रिय आहेर शिंपी सजामाचे अध्यक्ष रवींद्र बागुल, २६/११च्या हल्ल्यात प्राणाची बाजी लावून काम करणारे सैनिक संजय मोरे, शिंपी समाजाचे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र शिंपी, महिला जिल्हा अध्यक्ष सुजाता जगताप, बाबुराव खैरनार, विजय खैरनार, प्रशांत बिरारी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिंपी समाजातील नागरिक उपस्थित होते.

# उरणमध्ये द्रोणागिरी किल्ल्याच्या पायथ्याशी आढळली पुरातन तोफ

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



ऐतिहासिक द्रोणागिरी किल्ल्याच्या पायथ्याशी खोदकाम करताना एक पुरातन तोफ सापडली आहे. इतिहासप्रेमी आणि दुर्गप्रेमींच्या सहाय्याने ती वर काढण्यात आली असून त्या तोफेची पूजा करून ती व्यवस्थित ठेवण्यात आली आहे. उरणजवळच्या द्रोणागिरी किल्ल्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. किल्ल्याच्या परिसरात अनेक ऐतिहासिक खाणाखुणा आणि वस्तू आढळून येतात. या तोफेमुळे इतिहासाला उजाळा मिळणार असल्याची शक्यता आहे.

द्रोणागिरी किल्ल्याची सध्या पडझड झाली असून अशा प्रकारच्या अनेक ऐतिहासिक वस्तू जमिनी खाली गाडल्या गेल्या आहेत. सातवहानांच्या एका शिलालेखात उरणजवळील मोर गावाचा उल्लेख आहे. सातव्या शतकाच्या प्रारंभी पुलकेशी चालुक्याने मौर्यांची घारापुरी ही राजधानी काबीज केल्याचा उल्लेख येथील शिलालेखात आहे. घारापुरी या राजधानी पासूनजवळ असणाऱ्या उरण बंदराचे रक्षण करण्यासाठी करंजा बेटावरील द्रोणागिरी डोंगरावर किल्ला बांधला असण्याची शक्यता आहे.

द्रोणागिरी किल्ला देवगिरीच्या यादवांच्या ताब्यात होता. इ.स.१५३० मध्ये पोर्तुगीजांनी किल्ल्याची डागडुजी केली. १५३५ मध्ये अंतोनो-दो-पोर्तो या पाद्रीने नोसा-सेन्होरे, एन.एस. द पेन्हा व सॅम फ्रान्सिस्को ही चर्चेस बांधली. १६व्या शतकात काही काळ हा किल्ला आदिलशहाकडे होता. त्यानंतर हा किल्ला इंग्रजांकडे गेला. मुंबई बेटाच्या संरक्षणाच्या दृष्टीने घारापुरी किल्ला, उरण गाव व उरण जवळील करंजा बेटावर असलेला द्रोणागिरी किल्ला महत्त्वाचा होता. १० मार्च १७३९ला मानाजी आंग्रे यांनी उरणचा कोट व द्रोणागिरी किल्ला इंग्रजांकडून जिंकून घेतला असल्याची इतिहासात नोंद आहे.

द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी डाऊरनगर येथे खोदकाम करतानाही पुरातन तोफ सापडल्याने उरणच्या इतिहासाला उजाळा मिळण्याची शक्यता आहे. ही तोफ यादवांच्या काळातील आहे का पोर्तुगीज काळातील आहे याची माहिती मिळाली नसली तरी त्यावर संशोधन करणे गरजेचे आहे, असे मत इतिहासप्रेमींनी व्यक्त केले.

# डॉ. सुभाष वाघमारेंच्या कवितासंग्रहाला पुरस्कार

**सातारा : प्रतिनिधी**



येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज मधील मराठी विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. सुभाष वाघमारे यांच्या 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' या कवितासंग्रहास नेवासा तालुक्यातील तरवडी येथील सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील राज्यस्तरीय साहित्य-काव्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

संविधानाच्या स्वप्नातलं गाव या कवितासंग्रहास या पूर्वी वाचन संस्कृती प्रतिष्ठान श्रीरामपूर यांचा राज्यस्तरीय समाजप्रबोधन काव्य पुरस्कार मिळाला, तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा महाविद्यालयाने 'सर्जनशील साहित्य लेखन पुरस्कार व रुपये पाच हजार देऊन या कवितासंग्रहाचा गौरव केला आहे.

महाराष्ट्रातील हा सत्यशोधक वारसा असणारा पुरस्कार हा तिसरा पुरस्कार या ग्रंथास जाहीर झाल्याने 'रयत'चे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव व छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव डॉ. प्रतिभा गायकवाड, माध्यमिक विभागाचे सचिव संजय नागपुरे, ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, कर्मवीर विद्याप्रबोधिनीचे कार्यकारी संचालक प्राचार्य आर. के. शिंदे, छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभागातील डॉ. कांचन नलावडे, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. संजयकुमार सरगडे आदींनी डॉ. सुभाष वाघमारे यांचे अभिनंदन केले.

या वेळी अन्य विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या साहित्यांना पुरस्कार जाहीर झाले असल्याची माहिती देण्यात आली. पुरस्कार वितरण १९ डिसेंबरला तरवडी येथे राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांचे हस्ते प्रदान केले जाणार आहेत.





## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**

**सोमवार, दि. ६ डिसेंबर २०२१ रोजी होणारे**

## कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१५. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. काळण समाज हॉल, पनवेल
२. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- पडघे रा.जि.प. शाळा
- खिडूकपाडा रा.जि.प. शाळा
- खारघर गाव रा.जि.प. शाळा
- कोपरा समाज मंदिर
- काळुंद्रे रा.जि.प. शाळा
- घोट रा.जि.प. शाळा - (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघाची वाडी)
- धामोळे पाडा रा.जि.प. शाळा
- खुटारी/एकटपाडा रा.जि.प. शाळा
- किरवली/आडीवली रा.जि.प. शाळा
- धरणा रा.जि.प. शाळा


पान १ वरून

# दिव्यांग व स्वमग्न मुलांच्या विकासासाठी समाजातील संवेदना जागृत झाली पाहिजे

चांगली धारणा असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांची ओळख आहे. मी या संस्थेचा हितचिंतक असलो, तरी आमदार प्रशांत ठाकूर यांची मदत या संस्थेला उपयुक्त ठरणार आहे, असे आमदार भातखळकर यांनी अधोरेखित केले, तसेच यापुढे आम्ही दोघे या संस्थेच्या आणि दिव्यांग व स्वमग्न मुलांच्या विकासासाठी काम करीत राहू, असेही सांगितले.

हाच धागा पकडत आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आमदार अतुल भातखळकर नेहमी मदतीसाठी आग्रही असतात. त्याप्रमाणे त्यांनी या संस्थेच्या विकासासाठी कायम मदत केली आहे. संस्थेची निर्भयपणे वाटचाल सुरू असून त्यांचे काम अधिक व्यापक होण्यासाठी आमच्याकडूनही शक्य होईल तेवढी मदत करू.

# प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर जनरल बॉडी सदस्यपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव आणि पनवेलच्या महात्मा फुले आर्ट्स सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजचे विद्यमान प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांची महात्मा फुले शिक्षण संस्था इस्लामपूर जिल्हा सांगली या संस्थेवर जनरल बॉडी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

या संस्थेचे संस्थापक प्रा. एन. डी. पाटील हे असून डॉ. गणेश ठाकूर यांच्या प्रामाणिकपणे केलेल्या कामाचा उल्लेख ते नेहमीच आपल्या भाषणातून करत असतात. सध्या प्रा. एन. डी. पाटील यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते जाहीर सभांना उपस्थित राहत नाहीत. रयत शिक्षण संस्था सांभाळण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, परंतु आपण स्वतः स्थापन केलेल्या संस्थेचा कारभार प्रामाणिक व्यक्तींच्या हातात राहावा या उद्देशाने डॉ. गणेश ठाकूर यांची निवड करण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील व्यक्ती सांगली जिल्ह्यातील संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी निवडण्यात येते. असे आपण फार कमी वेळा झालेले पाहिले आहे. रयत शिक्षण संस्थेचे सचिव पद, मुंबई विद्यापीठाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार, मुंबई विद्यापीठाचा आदर्श कॉलेज पुरस्कार, कोकण रत्न पुरस्कार, रायगड भूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या डॉ. गणेश ठाकूर सरांची महात्मा फुले शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तळोजातील बेकायदा पार्किंग बेततेय जीवावर

## ■ प्रतिबंधात्मक पावले न उचलल्यास भाजपकडून आंदोलनाचा इशारा



**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसीतील कारखान्यांसमोर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर अवजड वाहने उभे केले जातात. त्यामुळे वाहतूक कोंडी तर होतेच त्याचबरोबर अपघाताला निमंत्रण दिले जाते. यामुळे महापालिकेच्या दोन स्वच्छताविषयक आणि सिडकोच्या एक बाग काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा बळी गेला. यामुळे येथील जीवघेणी बेकायदेशीर पार्किंग चव्हाट्यावर आली आहे. यासंदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या गेल्या नाही तर आंदोलन केले जाईल, असा इशारा तोंडरे गावचे माजी सरपंच तथा भाजपचे ग्रामीण तालुका उपाध्यक्ष राम महादू पाटील यांनी दिला आहे.

तळोजा एमआयडीसीमध्ये अनेक कारखाने आहेत. त्यामध्ये रासायनिक इलेक्ट्रिकल, फिशर व इतर कारखान्यांचा समावेश आहे. त्यामुळे कंपन्यांमध्ये माल उतरवण्यासाठी तसेच घेऊन जाण्याकरता मोठ्या संख्येने अवजड वाहने येतात. त्यात ट्रक कंटेनर आणि टँकरची संख्या जास्त असते. वास्तविक पाहता संबंधित कारखान्यांकडे पार्किंगची कोणतीच सोय नाही. त्याचबरोबर तळोजा एमआयडीसी कडूनही ट्रक टर्मिनस उभारण्यात आलेले नाहीत. त्यामुळे येथे येणाऱ्या वाहने रस्त्यावर पार्किंग केले जातात. तळोजा एमआयडीसीतील मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूने वाहने बेकायदेशीरपणे उभे केले जातात. या कारणाने वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होतो. तसेच येथे रहदारीला मोठा अडथळा निर्माण होतो. त्याचबरोबर लहान-मोठे अपघात दररोज घडतात.

विशेष करून दीपक फर्टीलायझर, बॉम्बे बेवरेज, केलोग्स या कंपन्यासमोर खुप अवजड वाहने उभी राहतात. यामुळे अशा प्रकारचे अपघात घडत असल्याचे मत भाजप ग्रामीण तालुका उपाध्यक्ष राम पाटील यांनी व्यक्त केले आहे.

तळोजा एमआयडीसीतील रहदारीच्या रस्त्यांवर बेकायदेशीर पार्किंगचा अक्षरशा ऊत आला आहे. जिकडेतिकडे वाहनेच वाहने अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघात घडतात. चार दिवसांपूर्वी तीन जणांचा बळी या बेशिस्त पार्किंग आणि वाहनांमुळे गेला. या संदर्भात वाहतूक पोलिसांकडून ठोस अशी कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे दररोज लहान-मोठे अपघात घडतात.

एमआयडीसीमध्ये येणाऱ्या वाहनांना पार्किंग करिता जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी औद्योगिक विकास महामंडळाची आहे. अशाप्रकारे पार्किंग नसल्याने गाडी खाली करणे त्याचबरोबर भरेपर्यंत रस्त्यावर उभे राहावे लागते. परिणामी मोठ्या प्रमाणात वाहने दुतर्फा दिसून येतात. त्यातून अपघाताला निमंत्रण मिळते. गेल्या अनेक वर्षांपासून ही समस्या डोकेवर काढत असताना एमआयडीसीकडून ठोस अशा उपाययोजना केल्या जात नाहीत.

### *ट्रक टर्मिनलबाबत हालचाली नाही*

***पार्किंगच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी, तसेच एमआयडीसीमध्ये अपघातप्रवण क्षेत्र निर्माण व्हावे व वाहतूक कोंडी फुटावी यासाठी या औद्योगिक वसाहतीमध्ये ट्रक टर्मिनल उभारण्यात यावेत, अशा प्रकारची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. सिडकोमध्ये झालेल्या बैठकीत याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गाऱ्हाणे मांडण्यात आले होते. त्यानुसार चार ट्रक टर्मिनल सहा महिन्यांत उभारण्यात यावेत अशा प्रकारच्या सूचना एमआयडीसीला देण्यात आल्या होत्या, मात्र अद्याप त्याबाबत फारशा हालचाली सुरू झालेल्या दिसून येत नाहीत.***

### *लहान-मोठे अपघात नित्याचेच*

***दरम्यान, तळोजा एमआयडीसीतील बेकायदेशीर पार्किंगमुळे पनवेल महानगरपालिकेचे स्वच्छता दूत शांताराम निरगुडा, काळूराम पारधी आणि सिडकोचे बाग कर्मचारी अनंता पारधी यांचा चार दिवसांपूर्वी बळी गेला. कामावरून घरी जात असताना तळोजा एमआयडीसीत त्यांचे अपघाती निधन झाले. टँकरला धडक बसल्याने या तिघांवर मृत्यू ओढवला. यामुळे संबंधितांचे कुटुंब अक्षरशा पोरके झाले आहेत. त्यांचा आधारच हरपला आहे. अशा प्रकारचे लहान-मोठे अपघात दररोज तळोजा एमआयडीसीतील बेकायदेशीर पार्किंगमुळे होतात.***

**“ तळोजा एमआयडीसीमधील मोठ्या कंपन्या समोर २४ तास अवजड वाहनांचा ठिय्या दिसतो. तासन्तास ट्रक टँकर तेथे उभे केले जातात. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होतो, तसेच अपघाताला निमंत्रण मिळते. यामुळे तीन जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. संबंधित यंत्रणा असे किती जणांचे बळी घेणार आहे असा आमचा संतप्त सवाल आहे. याबाबत वेळीच उपाय योजना कराव्यात अशी आमची न्याय मागणी आहे अन्यथा सर्वांना रस्त्यावर उतरून संबंधित विभागाला धडा शिकवावा लागेल याची नोंद घेण्यात यावी इतकीच माफक अपेक्षा आहे.**

**-राम पाटील, माजी सरपंच, तोंडरे ग्रामपंचायत**

# कळंबोलीत दूषित पाणीपुरवठा

## सभापती मोनिका महानवर यांनी वेधले सिडकोचे लक्ष

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीतील जलवाहिन्या जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी त्यांना गळती लागून दूषित पाणीपुरवठा केला जात आहे. प्रभाग क्रमांक १० मधील एलआयजी परिसरात अशाप्रकारे पाणी येत असल्याचे सभापती मोनिका महानवर यांनी सिडकोच्या निदर्शनास आणून दिले. त्याचबरोबर अधिकाऱ्यांना बोलावून घेऊन वस्तुस्थिती दाखवली. याबाबत उपाययोजना करून तेथील प्रश्नांची सोडवणूक करण्यात आली.



कळंबोली वसाहतीत ३० ते ३५ वर्षांपूर्वी जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. त्या जीर्ण आणि जुन्या झाल्या आहेत. मध्यंतरीच्या काळामध्ये मोटर लायनिंग करून त्यांचे लाईफ वाढवण्यात आले असले, तरी आजच्या घडीला परिस्थिती अत्यंत बिकट आहे. अनेक ठिकाणी वाहिन्यांमध्ये ड्रेनेजचे पाणी जाऊन रहिवाशांना दूषित पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात सापडले आहे. एलआयजीटूमध्ये अशाच प्रकारे दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती व स्थानिक नगरसेविका मोनिका प्रकाश महानवर यांनी सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाचे लक्ष वेधले. त्या ठिकाणी अधिकाऱ्यांना बोलावून घेऊन प्रत्यक्ष वस्तुस्थिती दाखवली त्यानुसार त्वरित कार्यवाही करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला.

# पुरातन मंदिरे जपूनच कर्नाळा सर्कल परिसरात सुशोभीकरण -राजू सोनी

**पनवेल : वार्ताहर**

वाहतूक कोंडीमुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या कर्नाळा सर्कलचे आकारमान कमी करण्यात येत असून असे असले तरी जोशी कुटुंबीयांची असलेली दोन्ही पुरातन मंदिरे त्या ठिकाणी कायम राहणार आहेत. उर्वरित भागाचे सुशोभीकरण करून तेथील अतिक्रमणे हटवून हा भाग वाहतुकीस मोकळा करण्यात येणार असल्याची माहिती नगरसेवक राजू सोनी यांनी दिली.



कर्नाळा सर्कलमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती, तसेच परिसरात अतिक्रमणसुद्धा होत होते. त्यामुळे वारंवार वाहतूक शाखेकडून या सर्कलचा आकार कमी करण्यासंदर्भात सूचना महानगरपालिकेस येत होत्या. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी असलेले जोशी कुटुंबीयांशी नगरसेवक राजू सोनी यांनी वारंवार चर्चा करून व त्यांनी दिलेल्या परवानगी नंतरच या सर्कलचे आकारमान कमी करण्याच्या कामाला सुरुवात केली आहे.

आगामी काळात तेथील दोन्ही मंदिरे कायम राहतील, तसेच परिसराचे सुशोभीकरण करण्यात येईल व सर्कलचे आकारमान कमी करून आजूबाजूचे सर्व अतिक्रमण काढून वाहतूक कोंडी सुरळीत होण्यासाठी सुंदर अशी वास्तू तेथे उभारण्यात येईल, अशी ग्वाही नगरसेवक राजू सोनी यांनी दिली.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पुढाकार घेत पनवेल शहर वाहतूक कोंडीमुक्त करण्याचा निर्धार केला आहे. यासाठी प्रायोगिक तत्त्वावर उपाययोजना करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर कर्नाळा सर्कल परिसरात पार्किंगला बंदी करण्यात आली असून हे सर्कल लहान करण्यात येत आहे.

# भाजप नेते पांडुरंग आमले पुरस्काराने सन्मानित

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा नोडमधील भाजपचे युवा नेते पांडुरंग आमले यांनी कोरोना काळात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना यशवंतराव चव्हाण फाउंडेशनच्या वतीने यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२० देऊन गौरविण्यात आले.



सानपाडा येथील सौराष्ट्र हॉलमध्ये यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर आणि ठाणे जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, तसेच ऐरोलीचे भाजप आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते पांडुरंग आमले यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२०ने सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात साईभक्त महिला फाऊंडेशन सानपाडा परिसरात महिला वर्गासाठी करत असलेल्या उल्लेखनीय जनताहितैषी कार्याचीही दखल यशवंतराव चव्हाण फाउंडेशनकडून घेण्यात आली. साईभक्त महिला फाउंडेशन या सामाजिक संघटनेलाही पुरस्काराने गौरविण्यात आले. साईभक्त महिला फाउंडेशनच्या शारदा पांडुरंग आमले व त्यांच्या महिला सहकाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या कार्यक्रमात भाजपचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, साताऱ्याचे माजी जिल्हाध्यक्ष भरत पाटील आदी उपस्थित होते.

# पत्नीची हत्या करून पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

**पनवेल : वार्ताहर**

एका व्यक्तीने घरगुती वादातून आपल्या पत्नीची गळा दाबून हत्या केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. रमेश वाघ (वय ४०) याने पत्नीची हत्या केल्यानंतर नाशिकमध्ये जाऊन स्वत:देखील किटकनाशक पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे उघडकीस आले आहे. नेरूळ पोलिसांनी आरोपी रमेश वाघ याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

आरोपी रमेश वाघ नेरुळ, सेक्टर-१० मधील एनएल-१ बी इमारतीत पत्नी कविता (वय ३०) आणि दोन मुलासह राहत होता. रमेश वाघ याची मुलगी आजीकडे गावी तर मुलगा चुलत्याकडे राहण्यास होता. कविताचा पती रमेश वाघ याला दारूचे व्यसन लागल्यामुळे तो काही एक काम करत नव्हता. त्यामुळे रमेश वाघ आणि त्याच्या पत्नीमध्ये सतत घरगुती कारणावरून वाद होत होते. दरम्यान रमेश आणि कविता या दोघांमध्ये भांडण झाले. या भांडणात त्याने कविताची गळा आवळून हत्या केली. त्यानंतर त्याने कविताचा मृतदेह घरामध्ये तसाच ठेवून घराला टाळे लावून नाशिक येथे पलायन केले. कविताची बहीण अर्चना हिने रमेश वाघ याच्या मोबाइलवर बहीण कविता सोबत बोलण्यासाठी फोन केल्यानंतर त्याने तिचा गळा, तोंड नाक दाबून तिला मारुन टाकल्याचे तसेच नाशिक रोड पोलीस स्टेशनमध्ये हजर होण्यासाठी जात असल्याचे सांगितले. त्यामुळे अर्चनाने नाशिक रोड पोलीस ठाण्यात धाव घेतल्यानंतर त्याठिकाणी रमेश वाघ याने किटकनाशक प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे रमेश वाघ याला नाशिक मधील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर मृत कविताच्या नातेवाइकांनी नेरूळ येथील घरी जाऊन कुलूप उघडून पाहणी केली असता आतमध्ये कविता मृतावस्थेत आढळून आली. या घटनेची माहिती मिळताच नेरुळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन कविताचा मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर पोलिसांनी रमेश वाघ याच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

# पनवेलमध्ये महाराजस्व अभियान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील पिसार्वे, वाजे, ओवळे, साई, नेरे, पोयंजे, पळस्पे गावात तहसीलदार विजय तळेकर यांच्या हस्ते महाराजस्व अभियान राबवण्यात आले.

सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांचे महसूल विभागांतर्गत दैनंदिन प्रश्न निकाली काढण्यासाठी आणि महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने सन २०१५ पासून राज्यात महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे.

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्याच्या अनुषंगाने या वर्षीही महाराजस्व अभियान राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय ११ नोव्हेंबर २०२१ निर्गमित झाला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडील २३ नोव्हेंबर २०२१ रोजीचे पत्रान्वये महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी प्रत्येक तालुक्यात मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत घेवून एका महिन्यापेक्षा अधिक काळ प्रलंबित असणारे फेरफार निर्गत करण्यात यावेत, असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पनवेल तालुक्यातील प्रत्येक मंडळामध्ये महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी फेरफार अदालत आयोजीत करून त्याबाबत व्यापक प्रसिध्दी करून पनवेल तालुक्यातील मंडळामध्ये फेरफार अदालतींचे आयोजन करण्यात आले आणि फेरफार अदालतीमध्ये एकुण १३१ प्रलंबित फेरफार निर्गत करण्यात आले.

प्रामुख्याने शिवार फेरी, फेरफार अदालत, अनधिकृत अकृषिक प्रकरणे शोधणे, अर्धन्यायिक प्रकरणांचा निपटारा करणे, अतिक्रमित शीव रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करणे व इतर बाबींचा समावेश असून जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे घटक राबविण्यात येणार आहेत. महास्वराज्य अभियान अंतर्गत या कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणात पनवेल तालुक्यात पनवेल तहसील कार्यालयाकडून आयोजन करण्यात येत आहे.

महसूल विभागात महसुली कामा व्यतिरिक्त इतरही कामे केली जातात. त्या विभागाची जबाबदारी महसूल कार्यालयावर असल्याने कामामध्ये कमी वेळ मिळाल्याने सातबाऱ्याच्या नोंदणीची कामे प्रलंबित राहतात. शासनाने ठरवून दिलेल्या आठवड्यातील ठराविक वारी हा उपक्रम राबविल्याने लोकांचा वेळ आणि श्रम निश्चितच वाचत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे प्रमाणे महाराजस्व अभियान आठवड्यातील दर बुधवारी राबवण्यात येणार असून याचा शेतकऱ्यांना निश्चितच लाभ मिळणार आहे, असे पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी सांगितले.

# नवनियुक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांचे अभिनंदन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी विजय कादबाने यांची नियुक्ती होऊन त्यांनी पदभार स्वीकारला. याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



कादबाने यांचे अभिनंदन करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक राजू सोनी यांच्यासह पनवेल सुवर्णकार संस्थेचे सचिव नईमुद्दीन शेख (रिंटू), पनवेल ज्वेलर्स एसोसिएशनचे अध्यक्ष छतरलाल मेहता, पनवेल सुवर्णकर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गावणकर यांनी केली त्यांची भेट घेतली. या वेळी पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून तसेच व्यापारी बांधवांच्या माध्यमातून वेळोवेळी पनवेल शहर पोलिसांना सहकार्याचीच भूमिका राहील व सर्वतोपरी मदत पोलीस खात्यास करू, अशा विश्वास नगरसेवक सोनी यांनी व्यापारी बंधूंच्या वतीने व्यक्त केला.



**पनवेल शहर पोलीस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांचे भाजप वावंजे विभागीय अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी अभिनंदन केले.**

# रसायनमिश्रित पाणी थेट नदीत

## कंपनीवर कारवाई करा; नगरसेवक हरेश केणी यांची मागणी

**तळोजा : रामप्रहर वृत्त**

तळोजा एमआयडीसी परिसरात करवले गावाच्या हद्दीत असलेल्या मुंबई वेस्ट मॅनेजमेंट रामकी या कंपनीमार्फत घातक बायोमेडिकल वेस्ट तसेच ई-कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावली जाते. संबंधित कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणात प्रदूषण केले जात असल्याचा आरोप येथील स्थानिक रहिवासी करीत आहेत. ४ डिसेंबर रोजी कंपनीमार्फत सोडण्यात आलेले दूषित रसायनमिश्रित पाणी येथील करवले नदीत सोडल्याने मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाले. यासंदर्भात नगरसेवक हरेश केणी यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला पत्र लिहून कंपनीवर कारवाईची मागणी केली आहे.



मागील आठवड्यात २६ नोव्हेंबर रोजी संबंधित कंपनीने या प्रकल्पासमोर सुरक्षा भिंत उभारली असल्याने यासंदर्भात येथील रहिवाशांनी रामकी कंपनीविरोधात निदर्शने केली होती. आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह नगरसेवक हरेश केणी हेदेखील या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यावेळीदेखील कंपनीमार्फत सोडले जाणारे दूषित पाणी शेती तसेच मत्स्य व्यवसायाला धोकादायक असल्याने याबाबत रामकी कंपनीने योग्य त्या उपाययोजना राबवण्याची मागणी स्थानिकांनी केली होती. या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला वर्ग, स्थानिक युवा वर्ग उपस्थित होता, मात्र कंपनी प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. त्यात अवकाळी पावसाने पनवेल परिसरातदेखील मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला. शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले पाहावयास मिळत असताना रामकी कंपनीतून निघणाऱ्या दूषित पाण्यामुळे करवले येथील नदीपात्रातील पाणी पूर्णपणे काळवंडले आहे. यामुळे शेती, मच्छीमारी धोक्यात आली आहे. विशेष म्हणजे जनावरांनादेखील दूषित पाणी प्यावे लागत असल्याने त्यांनादेखील धोका निर्माण झाला आहे. अशाप्रकारे सर्वसामान्यांच्या जीविताला धोका निर्माण करणाऱ्या कंपनीवर कडक कारवाई करून कंपनी त्वरित बंद करावी, अशी मागणी नगरसेवक हरेश केणी यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली आहे.

दरम्यान, मागील दोन दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे आमच्या प्रकल्प परिसरात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी शिरले होते. संबंधित पाणी हे अवकाळी पावसाचे आहे. कंपनी प्रशासनाने अशाप्रकारे कोणतेही दूषित पाणी सोडलेले नाही. तशी माहितीही आम्ही. एमपीसीबीला दिलेली आहे, असा दावा मुंबई वेस्ट मॅनेजमेंट रामकी या कंपनीचे प्रकल्प अधिकारी सोमनाथ मालगर यांनी केला आहे.

## संपादकीय

# राष्ट्रपतींचे रायगडात स्वागत!

महाराष्ट्रासह देशाचे स्फूर्तिस्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी देशाचे महामहीम राष्ट्रपती रामनाथ कोविंद आज हिंदवी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर येत आहेत. सन १९८५मध्ये तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग रायगडावर आले होते. त्यानंतर सुमारे ३५ वर्षांनी देशाच्या सर्वोच्चपदी असलेले राष्ट्रपती कोविंद रायगडी येत आहेत.

देशाच्या इतिहासात रायगड किल्ल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे, कारण रयतेचा जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडाला आपल्या राजधानीसाठी निवडले होते. सह्याद्रीच्या अभेद्य डोंगररागांमध्ये सुमारे ८२० मीटर म्हणजेच २७०० फूट उंचीवर असलेला हा किल्ला पूर्वी रायरी, पूर्वेकडील जिब्राल्टर, इस्लामगड, नंदादीप, जंबुद्वीप, तणस, राशिवटा, बदेनूर, रायगिरी, राजगिरी, भिवगड, रेड्डी, शिवलंका, राहीर अशा अनेक नावांनी ओळखला जात असल्याच्या नोंदी आहेत. शिवरायांनी या गडाचे महत्त्व जाणले आणि त्याला स्वराज्याची राजधानी करण्याचे ठरविले. या संदर्भात महाराजांची सभासद बखर म्हणते, 'राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोटा. चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे दीड गाव उंच. पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबाद पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीने थोडका. दौलताबादचे दशगुणी गड उंच असे देखोन बहुत संतुष्ट झाले आणि बोलिले, तक्तास जागा हाच गड करावा.' सोळाव्या शतकात राजांच्याच आदेशाने हिरोजी इंदुलकर यांनी या किल्ल्याला भव्य-दिव्य रूप देत त्याची नियोजनबद्ध उभारणी केली. महाराजांसोबतच माँसाहेब जिजामाता, राजेंच्या पत्नी यांचेही या गडावर वास्तव्य होते. पुढे गडावरील गार वारा सहन होत नसल्याने जिजाऊ पाचाड येथे राहण्यास गेल्या. शिवरायांचे पुत्र आणि महाराष्ट्राचा गौरव ठरलेले संभाजीराजेंनीदेखील रायगडावरून राज्यकारभार पाहिलेला आहे. या किल्ल्याने स्वराज्यात अनेक घडामोडी पाहिल्या आणि तो इतिहासाचा साक्षीदार ठरला. यातील एक सुवर्ण घटना म्हणजे शिवराज्याभिषेक होय. गडावरील राजसभेत ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६ अर्थात शनिवार ६ जून १६७४ रोजी शिवराजांचा राज्याभिषेक झाला. हा दिवस आजही मोठ्या उत्साहाने दरवर्षी गडावर साजरा केला जातो. या वेळी जणू शिवकाल जिवंत होत असतो. हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासारखा असतो. अशा या किल्ल्यावर दिग्गजांची उपस्थिती लाभली आहे. १९८५ साली देशाचे तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग किल्ले रायगडावर शिवरायांच्या समाधीस्थळी नतमस्तक होण्यासाठी आले होते. यानंतर सुमारे ३५ वर्षांनी रामनाथ कोविंद यांच्या रूपाने राष्ट्रपती रायगडावर येत आहेत. देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील ६ जानेवारी २०१४ रोजी रायगडावर येऊन महाराजांना अभिवादन करून गेले आहेत. तेव्हा ते गुजरातचे मुख्यमंत्री होती. देशाची धुरा हाती घेण्याच्या दृष्टीने आशीर्वाद घेण्यासाठी ते आले होते, तर त्याआधी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि अटलबिहारी वाजपेयी शिवरायांच्या चरणी नतमस्तक झालेले आहेत. राष्ट्रपती कोविंद यांच्या दौऱ्यावर जोरदार तयारी करण्यात आली आहे. तसे पाहिले तर रायगड आणि वाद हे समीकरण पूर्वापार चालत आले आहे. आताही राष्ट्रपतींचे हेलिकॉप्टर होळीच्या माळावर उतरण्यास काही शिवभक्तांनी विरोध दर्शविला होता, परंतु राष्ट्रपतींनी शिवरायांसाठी आपला प्रोटोकॉल बाजूला ठेवत रोप वेने किल्ल्यावर जात असल्याचे सांगून तमाम शिवप्रेमींची मने जिंकली आहेत. या संवेदनशील राष्ट्रपतींचे रायगडात मनःपूर्वक स्वागत!

# वीटभट्टीवरील शाळा

शाळाबाह्य विद्यार्थी हे देशाची समस्या आहे. कारण देशातील सर्वच भागात पोटाची खळगी भरण्यासाठी गरीब कुटुंब ही आपल्या पाल्यांना पाठीशी बांधून दरवर्षी पावसाळा संपला की स्थलांतरण करीत असतात. त्यापैकी वीटभट्टीवरील कामगार यांची मुले प्रामुख्याने ऑक्टोबर महिन्यापासून एप्रिल महिन्यापर्यंत म्हणजे तब्बल ७-८ महिने घराबाहेर आपल्या आई वडिलांच्या बरोबर असतात. त्यावेळी त्या वीटभट्टी कामगारांना आपल्या मुलांच्या शिक्षणाची नाहीतर आपली आणि आपल्या मुलांच्या पोटाच्या खळगीची खरी समस्या असते. ही शाळाबाह्य मुले देशाच्या पंतप्रधान यांच्या मन की बातचा विषय बनली आहेत. त्यामुळे त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सरकारी यंत्रणा कशाप्रकारे करू शकते यावर देशाच्या साक्षरतेचा आलेख अवलंबून आहे, मात्र शाळाबाह्य मुलांचे आईवडील यांच्यावर आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याची करावी लागणारी कसरत यावर काही ठोस उपाययोजना सरकारने आखल्यास त्या कुटुंबाना रोजगार देखील मिळेल आणि त्यांची मुले ही शिक्षणापासून वंचितदेखील राहणार नाहीत.

ही आपल्यासारख्या अनेक विकसनशील देशांची समस्या असली तरी रायगड जिल्ह्यातील नेरळ येथील एका रिक्षा चालकाच्या मुलीने आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करीत असताना वीटभट्टी कामगारांच्या मुलांची शाळा सुरू केली आहे. समाजात आपल्या मुलांनी चांगले शिकले पाहिजे असे वाटणारे सर्वच आहेत, पण आपल्या मुलांसोबत इतरांची मुलेदेखील शिक्षित झाली पाहिजेत, अशिक्षित राहायला नको असे वाटणारे फार कमी आहेत, मात्र नेरळ येथे रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविणारे बिरदोले गावातील भगवान जामघरे यांनी आपल्या अकरावीमध्ये शिकणाऱ्या मुलीची इच्छा प्रत्यक्षात आणली आहे. भाविका भगवान जामघरे हिने नेरळ विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण सुरू ठेवतानाच दामत भागातील वीटभट्टीवरील मुलांसाठी शाळा सुरू केली आहे. बालदिनी १४ नोव्हेबार रोजी वीटभट्टीवरील मुलांची शाळा वीटभट्टीवरच सुरू केली असून आज ३२ मुले त्या शाळत पाटीवर अक्षरे गिरवत आहेत.



नेरळ जवळील दामत येथील वीटभट्टी मालक बाबू नजे आणि फैजल खोत यांनी आपल्या वीटभट्टी वरील सर्व शाळाबाह्य मुले यांना एकत्र करण्यासाठी मदत केली. त्या मुलांच्या शाळेसाठी नजे यांनी एक खोली देखील उपलब्ध करून दिली आहे. सुरुवातीला २५ वीटभट्टी कामगारांच्या मुलांची शाळा सुरू झाली. शाळेचा पहिला दिवस असल्याने त्या सर्व मुलांना पाटी आणि पेन्सिल देऊन ही शाळा सुरू झाली असून आता त्या शाळेत ३२ मुले असून त्या मुलांना अनेक लोकांनी कपडे, पुस्तके, शैक्षणिक साहित्य देण्याची तयारी दर्शविली आहे. आठवड्यातून दोन दिवस भाविका जामघरे ही तरुणी शिकवणार आहे. भाविका या उपक्रमाचे कौतुक केले जात असून एप्रिल २०२२ पर्यंत सर्व मुलांना ती शिकवणार असून ममदापूर भागात आणखी दोन वीटभट्ट्या असून तेथील मुलांना देखील एकत्र आणून शिकविण्याचा तिचा प्रयत्न आहे.

### शाळाबाह्य मुले : राज्य सरकारची हतबलता

शाळाबाह्य मुले (out of school children) शोधून त्यांना शाळेच्या पटावर आणण्यासाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याचे आदेश शिक्षण मंत्रालयाने राज्यांना दिले आहेत. करोना साथरोगाचा शिक्षणावर झालेला परिणाम कमी करण्याच्या दृष्टीने शिक्षण मंत्रालयाने हे पाऊल उचलले आहे. करोना संकटामुळे शाळा बंद राहिल्याने विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी, तसेच विद्यार्थ्यांची शाळेतून गळती रोखण्यासाठी उपाययोजनांची शिफारसही मंत्रालयाने केली आहे. कामासाठी स्थलांतरित झालेल्या विद्यार्थ्यांचा शोध, त्यांचा शाळाप्रवेश आणि नियमित शिक्षण हा प्रमुख उद्देश आहे. 'शाळाबाह्य मुलांवर करोना संकटाचा झालेला परिणाम कमी करण्यासाठी प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाने योग्य धोरणाची आखणी करण्याची गरज आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांची गळती रोखणे, शाळा प्रवेश वाढविणे, अभ्यासाचे नुकसान भरून काढणे, सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे शक्य होईल, असे मत मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

### सर्वेक्षणाची गरज

सहा ते १४ वयोगटातील मुलांचा समावेश राज्यातील गजबजलेल्या वस्त्या, रेल्वेस्थानक, बसस्थानके, ग्रामीण भागातील बाजार, गुऱ्हाळ घर, गावाबाहेरची पालं, वीटभट्ट्या, दगडखाणी, मोठी बांधकामे, स्थलांतरित कुटुंबे, शहरातील झोपड्या, फुटपाथ, सिग्नलवर, रेल्वेमध्ये, रस्त्यावर भीक मागणारी बालके, लोककलावंतांची वस्ती, भटक्या जमाती, तेंदूपत्ता वेचणारी, विड्या वळणारी आदी विविध ठिकाणी काम करणारे बालमजूर, ऊसतोड कामगारांच्या वस्त्या, शेतमळ्यांवरील आणि जंगलातील वास्तव्य असलेल्या पालकांची बालके, मागास, वंचित गटातील आणि अल्पसंख्याक गटातील वस्तीतील मुलांचे सर्वेक्षण होणार आहे. शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने एक ते १० मार्च या कालावधीत विशेष मोहीम हाती घेतली आहे. यात सहा ते १४ वयोगटातील मुलांचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

याबाबतचा अध्यादेश नुकताच जारी करण्यात आला. शाळाबाह्य मोहिमेसाठी शालेय शिक्षण विभागासोबत न्याय व विशेष सहाय्य, महिला व बालविकास, एकात्मिक बालविकास योजना, कामगार विभाग, आदिवासी विकास, अल्पसंख्याक विकास आणि सार्वजनिक आरोग्य व गृहविभाग या विभागातील अधिकाऱ्यांचा सहभाग असणार आहे. त्यासोबतच सरकारी, खाजगी शाळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अंगणवाडीसेविका यांचीसुद्धा मदत घेतली जाणार आहे. या शाळाबाह्य मोहिमेसाठी नोडल अधिकारी नेमण्यात आले आहेत. पण ही समस्या काही सुटण्याचे नाव घेताना दिसत नाही.

**खबरबात**
**संतोष पेरणे**

### शोधमोहीम

राज्य सरकारने शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम राबविण्याचा संकल्प नुकताच जाहीर केला. सरकारने घेतलेला हा पुढाकार निश्चितच स्वागतार्ह आहे. यापूर्वीही शाळाबाह्य मुलांच्या नोंदणीचे प्रयत्न अनेक वेळा झाले आहे आणि या मोहिमांमुळे शाळाबाह्य मुलांची संख्या उत्तरोत्तर कमी होत आहे, मात्र संख्येमध्ये होणारी घट ही कागदोपत्री असून, प्रत्यक्षात हा भस्मासूर वाढतच आहे. मुलांनी शाळेपासून वंचित राहण्याने जी काही समस्या निर्माण होते ती केवळ त्या मुलांपुरती किंवा त्यांच्या कुटुंबापुरती मर्यादित राहत नाही; तिचा परिणाम अर्थव्यवस्था, कायदा-सुव्यवस्था, समाजस्वास्थ्य अशा अनेक अंगांनी होतो, तसेच देशाचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वाया जाते. त्यामुळे ही एक राष्ट्रीय समस्या आहे. त्यामुळे शाळाबाह्य मुलांच्या प्रश्नाकडे सर्वोच्च प्राधान्याने व सर्वंकष दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. तीन ते १६ वर्षे वयोगटातील जी मुले शाळेत जात नाहीत, त्यांना शाळाबाह्य विद्यार्थी म्हटले जाते.

दरम्यान, वीटभट्टीवर काम करणारे कामगार यांच्या शाळाबाह्य मुलांना एकत्र करून आपल्या शिक्षणातून वेळ काढून शिकविण्याचा ध्यास घेतलेल्या भाविका जमाघारे हिचे कौतुक कर्जत तालुका पंचायत समितीच्या गट शिक्षण अधिकारी सुरेखा हिवरे यांनी केले आहे. आपण लवकरच त्या स्थलांतरित मुलांच्या शाळेला भेट देऊन अशा मुलांना कशापद्धतीने शिक्षण दिले पाहिजे याचे मार्गदर्शन करणार असल्याची माहिती गट शिक्षण अधिकारी हिवरे यांनी दिली आहे. भाविकाने सुरू केलेल्या वीटभट्टीवरील शाळेत भिवंडी पडघा, खालापूर हाळ, वांगणी आणि कळंब येथील कातकरी कुटुंबातील मुलांचा समावेश आहे.

# कर्जत-नेरळ राज्यमार्गावरील मुख्य वीजवाहिनीचा खांब कोसळण्याच्या स्थितीत

**कर्जत : बातमीदार**

कर्जत-नेरळ राज्यमार्गावर वांजळे गावाच्या हद्दीत हडप वडापाव दुकानाच्या पुढे महावितरण कंपनीचा वीज वाहून नेणारा खांब कधीही कोसळेल अशा स्थितीत आहे. त्याबद्दल महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे. दरम्यान, महावितरण कंपनीने तो विजेचा खांब हलविण्याबाबत अद्याप कोणत्याही प्रकारची खबरदारी घेतली नसल्याने भविष्यात त्या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.

कर्जत तालुक्यातील वांजळे येथे कर्जत-नेरळ-कल्याण राज्यमार्ग रस्ता असून या रस्त्याच्या कडेने महावितरण कंपनीची जादा दाबाची वाहिनी जात आहे. त्या वाहिनीच्या माध्यमातून डिकसळ गावाकडे जाणारा वीजपुरवठा केला जातो. संबंधित वीज वाहिनीचा वांजळे येथे उभा असलेला खांब हा धोकादायक अवस्थेत आहे. त्या भागातील विजेचे खांब हे रस्त्याच्या कडेने उभे करण्यात आल्याने आणि त्यातून मुख्य वीज वाहिनीचा दाब असल्याने त्यांच्याबद्दल सातत्याने तक्रारी केलेल्या आहेत. त्यात गेल्या महिन्यापासून हडप वडापाव दुकानाच्या पुढे असलेला वीज वाहून नेणारा खांब हा रस्त्याकडे कलंडला आहे. त्यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता आहे. त्याच वेळी अपघात होऊन मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

रस्त्याच्या दिशेने कलंडलेल्या विजेच्या खांबाबाबत या भागातील जागरूक नागरिक किशोर गायकवाड यांनी महावितरणचे अभियंते यांना कर्जत कार्यालयात जाऊन कळविले होते. त्याच वेळी माथेरानमधील नगरसेवक शिवाजी शिंदे यांनीदेखील महावितरण कार्यालयाला सूचना देतानाच सोशल मीडियावर त्याबाबत माहिती दिली होती, मात्र महावितारण कंपनीकडून त्या



विजेच्या खांबाबद्दल काहीही हालचाल होताना किंवा तो धोकादायक विजेचा खांब बदलण्याची कार्यवाही देखील होताना दिसत नाही.





# टीएमसी कॉलेजमध्ये नवमतदार नोंदणी कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये नुकतेच १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे नवमतदार म्हणून नोंदणी फॉर्म भरून घेण्यात आले. जवळपास ३५ नवमतदार यांनी फॉर्म भरले असून ते सर्व फॉर्म कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना यांनी तहसील कार्यालय निवडणूक विभाग यांच्याकडे जमा केले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना आता मतदार ओळखपत्र मिळणार असून पुढील मतदानाच्या प्रक्रियेत त्यांना मतदान करता येईल, असे तहसीलदार प्रियांका आयरे-कांबळे यांनी सांगितले. माणगाव तहसील कार्यालय निवडणूक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डीएलएलई विभाग यांच्या सयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी नायब तहसीलदार निवडणूक विभाग, तसेच सर्कल व तलाठी यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्रा. संध्या कुलकर्णी, प्रा. डॉ. माळी, अमित बाकाडे यांनी मदत केली.

# रेवदंडा ग्रामपंचायत पोटनिवडणूक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

**मतदारांमध्ये निरुत्साह**

अलिबाग तालुक्यात जाहीर झालेल्या पोटनिवडणुकीनुसार रेवदंडा ग्रामपंचायतीत सुद्धा रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक होत आहे, मात्र पोटनिवडणुकीचा कोणताही उत्साह मतदारांमध्ये दिसून येत नाही.





रेवदंडा ग्रामपंचायतीत मंगळवारी (दि. २१) प्रभाग क्रमांक दोन, तीन, चार व पाच या मधील रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक नेमलेल्या मतदान केंद्रावर घेण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीसाठी राजिप शिक्षक विभाग वरिष्ठ विस्तार अधिकारी रमेश सदू चव्हाण यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर बामणगाव ग्रामसेवक अमोल खाडे यांची सहा. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# मानव कल्याणासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची गरज


६ डिसेंबरला मोठ्या संख्येनं भारतातीलच नव्हे तर संपूर्ण विश्वातील लोक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी जमतात. मोठ्या श्रद्धेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करतात, पण काय हे पुरे आहे? काय खरंच आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचवू शकलो आहोत काय?

आज अजूनही गरज आहे मानवकल्याणासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहचविण्याची. आज ७१ वर्ष होऊनसुद्धा सामान्य नागरिकांना त्यांचे काय अधिकार आहेत? काय कर्तव्य आहेत? याची जाणच नाही. मग ते लढतील कसे?

बाबासाहेब, आज आमच्यावर अन्याय झाला की, आम्हाला तुमची आठवण होते. एरव्ही नाही. माझ्यावर अन्याय झाला की, मला सर्वप्रथम वकील, कोर्ट, न्याय व्यवस्था, व्यवस्थापन, प्रशासन तुम्ही लिहिलेली घटना सर्व आठवतं आणि न्याय मागण्यासाठी आम्ही हे सर्व दरवाजे ठोठावतो.

बाबासाहेब, आम्ही तुमच्या जीवनाकडे जेव्हा बघतो तेव्हा आम्हाला खूप आश्चर्य वाटते की आपण त्या काळात कसे काय लढलात? एकटेच तर होता तुम्ही! संपूर्ण व्यवस्था तुमच्या विरोधात होती. जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट तर्कशुद्ध पद्धतीने मांडत होता तेव्हाही त्या वेळच्या व्यवस्थेला ती रुचत नव्हती, पचनी पडत नव्हती. तुमच्या हुशारीचा व बुद्धिमत्तेचा काहीच विचार केला जात नव्हता. पावलोपावली अपमान केला जायचा. काय वाटत असेल हो तुम्हाला? कसं काय आपण हे सर्व सहन केलं? तरीही तुम्ही हरला नाहीत. लढत राहिला आणि सदैव सर्वसामान्यांच्या बाजूला उभे राहून त्यांना न्याय व हक्क मिळवून दिले.

मी जेव्हा तुमचा एक-एक सत्याग्रह, आंदोलन बघतो तेव्हा मला खूप आश्चर्य तर वाटतेच व अभिमान सुद्धा वाटतो. महाड चवदार लढ्याचा सत्याग्रह बघा ना. गोष्ट एवढीच होती की, सर्वांना पाणी मिळावे. विशेष करून समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत हे पाणी मिळण्याची. बाबासाहेब आपण हे आंदोलन का केले? हे आता आम्हाला कळले. बाबासाहेब आपणास माहीत होते की, चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने लोक काय अमर होणार नाहीत किंवा ते काही अमृत नव्हते, परंतु आपल्या आंदोलनाच्या मागे उद्देश होता सामान्य माणसांना समान अधिकार मिळण्याचा. किती महान उद्देश होता आपला. एका सत्याग्रहातून आपण एक मोठे बंडाचे निशाण फडकावून यशस्वी केले. तेव्हासुद्धा तुमच्या जिविताला धोका होता परंतु आपण डगमगला नाहीत. आपल्या जीवाची पर्वा केली नाही. आपण मानव कल्याणासाठी सतत लढत राहिलात.



मला तुमचा दुसरा सत्याग्रह आठवतो. तो म्हणजे मंदिरामध्ये सर्वांना प्रवेश करण्याचा. बाबासाहेब तुम्हाला माहीत होते हा सामान्य तळागाळातील माणूस मंदिरात जाऊन काही अमर होणार नाही किंवा पवित्र होणार नाही. पण या प्रवेशामुळे तो माणूस म्हणून त्याला मंदिरात जाण्याचा अधिकार आहे तो त्याला मिळणार आहे. हेसुद्धा आपण मानवाच्या कल्याणासाठीच केले.

बाबासाहेब, आपण जीवाचे रान करून दोन वर्ष ११ महिने व १७ दिवस अथक परिश्रम घेतले व आम्हा सर्व सामान्यांना न्याय मिळवून देणारी घटना भेट दिली.

बाबासाहेब, आपण जेव्हा लढलात तेव्हाची परिस्थिती ही फार बिकट होती. समाज शिकलेला नव्हता. अडाणी होता. त्यांच्या हक्कासाठी तुम्ही लढलात व यशस्वीसुद्धा झालात. त्यात तुम्ही स्वतःसाठी कधीच लढला नाहीत किंवा कुठलीही संपत्ती जमा केली नाही. आपण लोककल्याण केले हीच आपली खरी संपत्ती. म्हणून तर बाबासाहेब आजही आपले नाव घेतले की त्याला वजन आहे एवढेच नाही, तर त्याला जरब सुद्धा आहे. कसे काय जमले हो बाबासाहेब तुम्हाला हे? बरोबर आहे त्यात तुमचा काही स्वार्थ नव्हता. तुम्ही निःस्वार्थपणे तळागाळातील माणसापासून तर सर्वांना न्याय मिळेल यासाठी लढले म्हणून आजही तुमचे स्मरण केले जाते.

बाबासाहेब, तुम्ही आम्हाला न्याय मिळवून दिला, अधिकार मिळवून दिले, संपूर्ण मानवकल्याणासाठी व्यवस्था निर्माण केली. एवढेच नाही तर घटनासुद्धा मिळवून दिली, पण बाबासाहेब जरी आज मी एवढा शिकला सवरला असूनही माझ्यावर अन्याय होतो आहे. माझ्यात आंदोलन करण्याची हिंमत नाही. मला भीती वाटते. तर्कशुद्ध विषयांवर मला प्रश्न करण्याची हिंमत होत नाही. मी कोणाला प्रश्न विचारू शकत नाही. मला घटनेने अभिव्यक्ती स्वतंत्र्य दिले, परंतु अभिव्यक्त होता येत नाही. मला भीती वाटते. का बरं बाबासाहेब मी करजोर झालो? तर मी आपण दिलेला मूलमंत्र 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' या विचारापासून दूर गेलो. मी शिकलो, पदव्या मिळविल्या, पण मी संघटित नाही झालो. संघर्ष तर सोडाच.

आज बाबासाहेब माझे सर्व अधिकार काढून घेतले जात आहेत. तुम्ही मिळवून दिलेली पेन्शन गेली, कंत्राटी धोरणामुळे सुरक्षित मिळालेला रोजगार गेला. आता कसले कामाचे तास आणि सुट्ट्या. मालक म्हणेल ती पूर्व दिशा. मी सेवानिवृत्त झालो त्या रकमेवर मिळणारे व्याज हे नगण्य झाले.

मी शिकलो, पण माझ्यातील लढण्याचा आत्मविश्वास गमावला. असे म्हणतात की, शिकल्याने माणूस शहाणा होतो पण, शिकण्यासोबत मी संघर्षाची नाळ तोडल्यामुळे मी कमजोर झालो.

आज बाबासाहेब गरज आहे आपल्या विचारांची, आपल्या संघर्षाची, सत्याग्रहाची, समर्पणाची, लोककल्याणाच्या उद्धाराची जाण राखण्याची.

आज लढण्यापूर्वी माझ्या डोक्यात विचार येतो लढून काय होईल? माझे आंदोलन चिरडले गेले तर माझे काय होईल?

बाबासाहेब, अन्याय पूर्वीही होत होता व आताही होत आहे, परंतु आता अन्याय का होत आहे तर समोरच्याला माहीत आहे की यांच्यातील लढण्याची वृत्ती नष्ट झाली आहे व हा समूह समूहाच्या कलहातून विभागलेला आहे. जेव्हा आपण मानवाला मानव म्हणून त्याकडे बघून मानव कल्याणासाठी लढू तेव्हाच मानवाचे कल्याण होईल व तो उद्धाराकडे जाऊन त्याचे शोषण कमी होईल. मानव कल्याण उद्धारकर्त्याला विनम्र अभिवादन.

**-अरविंद मोरे,** नवीन पनवेल
मो. ९८२०८२२८८२

# अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीमुळे रॉयल्टीत सवलत आणि मुदतवाढ मिळावी

## ■ वीटभट्टी उत्पादकांची मागणी

**कर्जत : बातमीदार**

अवकाळी पावसाने शेतकरी आणि वीटभट्टी उत्पादक यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. त्यामुळे तालुक्यातील वीटभट्टी उत्पादकांनी एकत्र येत कर्जत तहसीलदारांना रॉयल्टीमध्ये सवलत व भरण्यासाठी मुदतवाढ मिळावी, असे निवेदन देण्यात आले. पावसाचे बदललेले ऋतुमान यामुळे आगामी कालावधीमध्ये सुद्धा अवकाळी पावसाची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन वीट उत्पादकांनी कर्जतचे निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी भेट घेऊन रॉयल्टी भरण्याची मुदत वाढवावी आणि सवलत द्यावी, अशी मागणी करणारे निवेदन वीटभट्टी उत्पादक यांच्याकडून देण्यात आले.

या वेळी रवींद्र देशमुख, पंढरीनाथ राणे, राजेश जाधव, अनंता धुळे, धोंडू राणे, उत्तम शेळके, रवींद्र भोईर, शैलेश पाटील, संतोष बोराडे, सरफराज मुल्ला,




जयंता भोईर, नरेश भोईर, चंद्रकांत शेळके, रवींद्र शेळके, मन्सूर मालदार, अंकुश भोईर, चंद्रकांत हगावणे, हनिस हवालदार, रामदास शेळके, कुमार गंगावणे, अशोक पाटील, महेंद्र जाधव, नंदू लाड, जयेंद्र मुने, अतुल काळोखे, प्रभाकर पाटील, हनुमंत पाटील, प्रकाश बागडे, झाकीर कर्णेकर, राजेश कर्णूक, किशोर दळवी आदी वीट उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कर्जत तालुक्यातील मातीपासून बनलेली वीट बांधकाम व्यावसायिक हे विशेष पसंत करीत असतात. त्या वीटभट्टी उत्पादक यांचे अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. वेधशाळेने दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे पाऊस येईल आणि जाईल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती, मात्र पावसाने सुरू केलेली रिपरिप तब्बल १५ तास सुरू होती आणि त्या पावसामुळे शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे.तालुक्यातील सर्व भागात वीटभट्टी व्यवसाय स्थानिक तरुण शेतकरी करीत आहेत.

वीटभट्टी व्यवसाय सुरू करण्यापासून अनेक अडचणी निर्माण होत आहेत, तसेच अचानक येणाऱ्या अवकाळी पाऊसामुळे खूप नुकसान झाले आहे. वीटभट्ट्यांवर विटांचे उभे असलेले थर कोसळून गेले आहेत. सर्वत्र बनवलेल्या विटांची माती झाली आहे. त्यामुळे विटा बनविण्यासाठी घेतलेली मेहनत फुकट गेली असल्याचे दिसून येत आहे.

# खोपोलीत शाळेच्या छप्पर दुरुस्तीस विलंब; पालकांत नाराजी

**खोपोली : प्रतिनिधी**


(छाया : जयवंत माडपे)

नगरपालिका हद्दीतील खोपोली प्रशासनाच्या शाळा क्रमांक आठ या इमारतीच्या उडालेल्या छप्पर दुरुस्तीस ठेकेदाराने विलंब लावल्याने, विद्यार्थ्यांची बसण्याची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. या पार्श्वभूमीवर पालकांनी पालिका प्रशासनाच्या गलथान कारभाराविरोधात तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावात वासुदेव बळवंत फडके शाळा क्रमांक ८ आहे. मागील वर्षी वादळात इमारतीचे वरील पत्रे उडाले होते. शाळा सुरू होऊनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले होते. येथील मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी शिक्षण समितीकडे दुरुस्तीबाबत वारंवार प्रशासनाला कळवले, मात्र प्रशासनाने याच्याकडे दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप पालकांनी व स्थानिक नागरिकांनी केला. अखेर आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर पालिका मुख्याधिकारी यांनी दुरुस्तीचे आदेश बांधकाम विभागाला दिले. ठेकेदाराला काम देण्यात आले, मात्र गेला महिनाभर त्या इमारतीच्या छपरावरील पत्रे काढून शाळेच्या आवारातच अस्ताव्यस्त ठेवण्याशिवाय ठेकेदाराने काहीच काम केले नाही. त्यामुळे पुन्हा पालक व ग्रामस्थ यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना दाटीवाटीने बसवावे लागत आहे. धक्कादायक बाब अशी की हेच काम तीन वेळा ठेकेदाराने केले होते. करोनाचा प्रादूर्भाव अद्याप गेला नसल्याने, एका बेंचवर तीन-तीन विद्यार्थ्यांना बसवण्याशिवाय पर्याय नसल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ठेकेदाराला तातडीने काम करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी पुढे येत आहे.

# पशुसंवर्धन वैयक्तिक लाभासाठी अर्ज करण्याचे प्रशासनाकडून आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्याच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित व बेरोजगार युवकांसह पशुपालक व शेतकरी बांधवाना स्वयंरोजगार मिळावा व त्यांना आर्थिक लाभ मिळावा यासाठी पशुसंवर्धन विभागाने विविध योजना व उपक्रमाद्वारे ग्रामीण जीवन गतिमान करण्यासाठी विविध वैयक्तिक लाभ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सन २०२१-२२ जिल्हास्तरीय व नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत दिनांक ४ ते १८ डिसेंबर या कालावधीत आर्ज हे http//ahmahabms.com या संकेत स्थळावर स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानुसार मुरूड तालुक्यामध्ये जिल्हास्तरीय (दुधाळ गट, शेळी गट) व नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गायी म्हशीचे गट वाटप करणे, शेळी-मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्ष्यांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे या योजना ऑनलाईन प्रणालीनुसार अर्ज मागवून राबविल्या जाणार आहेत.

यापूर्वी ऑफलाईन पद्धतीने सन २०२१-२२ करिता पंचायत समिती स्तरावर आलेले अर्ज हे रद्द करण्यात येत आहेत, तसेच अशा पशुपालकांनी पुन्हा हे अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करावयाचे आहेत. याबाबत अधिक माहिती देताना मुरूड तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी डॉक्टर सुदर्शन पाडावे यांनी सांगितले की, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय वैयक्तिक लाभाच्या योजना या दरवर्षीप्रमाणे अर्ज सादर न करता ऑनलाईन पद्धतीने शासनाच्या वेबसाईटवर जाऊन अर्जाची नोंद करावयाची आहे. सदरच्या योजनेचा अर्ज लोकांनी लवकरात लवकर सादर करावा. जर अधिक माहितीसाठी मुरूड येथील पशुसंवर्धन कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# पेण पालिकेने शहरात ठिकठिकाणी बसवले सौरदिवे

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सुविधा शहरातील नागरिकांना पुरविण्याचे ध्येय हाती घेतलेल्या नगराध्यक्षा प्रितम पाटील व त्यांचे सहकारी, तसेच पेण नगर परिषदेतील अधिकारी व कर्मचारी जास्तीत जास्त आर्थिक बचत कशी करता येईल याकडे लक्ष देत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पेण नगर परिषदेने विजेची बचत करण्यासाठी सौर ऊर्जेवरील विविध पथदिवे उभारण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे जवळपास ५० टक्के वीज बचत करण्यात पालिका यशस्वी


(छाया : अनिस मनियार)

ठरणार आहे.

पेण नगर परिषदेने मागील काही महिन्यांत असंख्य सौरदिवे लावले आहेत. त्यामध्ये हायमास्क, मिनी हायमास्क, सोलर दिवे, सोलर हायमास्क असे पथदिवे लावून पेण शहर विजेचा वापर न करता प्रकाशमय करण्याचा यशस्वी प्रयत्न करत असल्याचे दिसत आहे. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत असल्याने आणि या योजनेचे शहरातील नागरिकांकडून स्वागत होत असल्याने आणखी काही महिन्यात सौरदिवे लावले जाणार आहेत. प्रस्तावित कामाला मंजुरी मिळाली असल्याने येत्या महिनाभरात आणखी सोलर दिवे देखील नगर परिषदेच्या माध्यमातून शहरातील विविध भागांत लावण्यात येणार आहेत. त्यामुळे पालिकेला आणखी वीज बचत करण्यात यश मिळणार असून पथदिव्यांच्या माध्यमातून शंभर टक्के वीज बचत करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

> **यापुढे देखील असेच पथदिवे लावण्यात येणार आहेत. पथदिवे कुठे लावायचे असतील तर नागरिकांनी पालिकेमध्ये लेखी अर्ज केला तर त्याचा नक्की विचार करण्यात येईल.**
> **-शिवाजी चव्हाण, पालिका अधिकारी**

> **सौरऊर्जेवरील पथदिवे लावल्याने पालिकेवरील आर्थिक भार कमी झाला आहे. शिवाय विद्युत पुरवठा खंडित झाल्याने पथदिवे बंद होण्याचे प्रमाण देखील कमी झाले आहे. पालिकेने ही योजना शहरातील सर्व भागात राबवावी, या योजनेचे आम्ही स्वागत करत आहोत.**
> **-गोवर्धन पाटील, नागरिक**

# इमेज कॅलेंडर छायाचित्र स्पर्धेचा निकाल जाहीर

## अतुल मोरे यांनी पटकाविला प्रथम क्रमांक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नैसर्गिक सौंदर्याची इमेज आपल्या कॅमेरात बंद करण्याचा मोह सर्वांना होतो. अशा रायगड जिल्ह्यातील हौशी आणि व्यावसायिक छायाचित्रकारांच्या कलेला वाव देण्याचा प्रयत्न इमेज कॅलेंडर गेले चार वर्ष सातत्याने करीत आहे. यंदाही २०२२च्या वार्षिक कॅलेंडरसाठी छायाचित्र स्पर्धा आयोजित केली होती. या छायाचित्र स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातून आलेल्या शेकडो छायाचित्रांमधून १२ छायाचित्रांची निवड मान्यवर परीक्षकांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या छायाचित्र स्पर्धेत छायाचित्रकार अतुल मोरे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. द्वितीय क्रमांक जुनेद तांबोळी आणि तृतीय क्रमांक राकेश मोरे यांच्या छायाचित्रांचा आला आहे. यामुळे २०२२च्या इमेज कॅलेंडरच्या दिनदर्शिकेमध्ये रायगड जिल्ह्यातील निसर्गाची छबी अवतरलेली पाहावयास मिळणार आहे.



दिनदर्शिकेच्या विश्वात इमेज कॅलेंडरने आपले स्थान अढळ करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवली आहे. तीन वर्षांच्या यशस्वी प्रसिद्धीनंतर चौथ्या वर्षीदेखील कॅलेंडर प्रकाशन करण्याच्या दिशेने अलिबागच्या छायाचित्रकारांच्या त्रिकुटाने वाटचाल केली आहे. यंदा कॅलेंडरच्या प्रत्येक पानावर रायगड जिल्ह्यातील निसर्ग चित्र, गड आणि किल्ल्यांचे छायाचित्र प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यासाठी इमेज कॅलेंडर संस्थेने छायाचित्र स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला जिल्ह्यातून शेकडो छायाचित्रकारांचा सहभाग लाभला होता.

प्रथम क्रमांक अतुल मोरे, द्वितीय क्रमांक जुनेद तांबोळी, तृतीय क्रमांक राकेश मोरे, चतुर्थ क्रमांक नितीन शिर्के, पाचवा क्रमांक मंदार धुळप, सहावा क्रमांक महेंद्र म्हात्रे, सातवा क्रमांक कल्पेश गणेश पाटील, आठवा क्रमांक निलेश पाटील, नववा क्रमांक कल्पेश जयवंत पाटील, दहावा क्रमांक प्रथमेश घरत, अकरावा क्रमांक आझाद जाधव आणि बाराव्या क्रमांकासाठी मनोज पाटील यांच्या छायाचित्राची निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी सादर करण्यात आलेल्या शेकडो छायाचित्रांमधून कॅलेंडरच्या १२ पानांसाठी निवड करणे जिकरीचे होते. यासाठी इमेज कॅलेंडर संस्थेने पुणे येथील ज्येष्ठ चित्रकार मुकुंद बहुलेकर यांची निवड केली होती. त्यांच्या परीक्षणानंतर १२ छायाचित्रांची निवड करण्यात आली आहे. क्रमांकानुसार कॅलेंडरच्या पहिल्या पानावरून छायाचित्रकारांची छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती इमेज कॅलेंडरचे संस्थापक जितू शिगवण यांनी दिली आहे.


# अलिबाग शहर आणि परिसरात मोकाट गुरांचा वाढता उपद्रव

**अलिबाग : प्रतिनिधी**

काही वर्षांपूर्वी केवळ पावसाळ्यातच अलिबागकरांना मोकाट गुरांचा उपद्रव सहन करावा लागत होता, पण आता १२ महिने हा उपद्रव सहन करावा लागत आहे, शनिवारी रात्री दोन मोकाट बैलांच्या झुंजीमुळे एसटी स्टॅण्डसमोर नागरिकांची पळापळ झाली. शिवाय वाहनांचीदेखील मोडतोड झाल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

अलिबाग शहरात, रेवस रोड, रेवदंडा रोड या मार्गावर मोकाट गुरे कळपाने उभी किंवा भररस्त्यात ठिय्या मांडून बसलेली असतात. बऱ्याच वेळा त्यांच्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. शनिवारी सायंकाळी घडलेल्या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला. या व्हिडिओमध्ये एसटी स्टँडजवळ दोन बैल समोरासमोर आले आणि काही क्षणात त्यांच्यात झुंज लागली. यामुळे आजूबाजूला उभे असणाऱ्या लोकांची एकच पळापळ झाली. ही झुंज बराच वेळ सुरू होती. लोक त्यांना हाकलविण्याचा प्रयत्न करीत होते, पण त्यांचा त्या बैलांवर काही परिणाम होत नव्हता. या झुंजीत एकमेकांना टक्कर देताना या बैलांनी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकी पाडून त्यांचेदेखील नुकसान केल्याचे दिसून येत आहे.

बऱ्याच वेळानंतर त्यांची झुंज संपली. त्यातील एका बैलाने पळ काढला. हा प्रकार थोडक्यात निभावला. जर ही झुंज ऐन बाजारात किंवा गर्दीच्या ठिकाणी झाली असती तर ती नक्कीच एखाद्याच्या जीवावर बेतली असती. बऱ्याचदा काही गुरे वाहनचालकांच्या अंगावर धावून जातात किंवा अचानक रस्त्याच्या मधून धावतात. मोकाट गुरांचा हा मुक्तसंचार अपघातास निमंत्रण देणारा आहे. त्यामुळे शनिवारी घडलेल्या घटनेची नगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन या गुरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी आता नागरिक करीत आहेत. अलिबागेतील या मोकाट बैलांच्या झुंजीचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.




# अलिबागमध्ये पत्रकारांची आरोग्य तपासणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून रायगड प्रेस क्लब, अलिबाग प्रेस असोसिशन, इंडियन मेडिकल असोसिएशन अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमधील पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्यात आली.


यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन अलिबागचे अध्यक्ष डॉ. विनायक पाटील, डॉ. कुमार जन्नावार, मेमोरियल हॉस्पिटलचे डॉ. प्रशांत जन्नावार, डॉ. अपूर्वा पाटील, नेत्रतज्ज्ञ डॉ. समीर नाईक, त्वचारोगतज्ज्ञ डॉ. निशिगंधा म्हात्रे, दिशा पॅथोलॉजी लॅबचे डॉ. दीपक गोसावी यांनी पत्रकारांची तपासणी केली. या वेळी रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे माजी अध्यक्ष हर्षद कशाळकर, उपाध्यक्ष राजेश भोस्तेकर, कार्याध्यक्ष प्रमोद जाधव, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# ऐतिहासिक परंपरा लाभलेला रायगड किल्ला

रायगड किल्ला ता. महाड जि. रायगड येथे आहे. गिरिदुर्ग म्हणून तो प्रसिद्ध आहे. या गडाची उंची समुद्रसपाटीपासून ८६२ मी आहे. याचे उपनाम रायरी आहे. जवळचे नाव पाचाड आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी महाड-पाचाड मार्गाने जावे लागते. रायगडला येण्यासाठी अनेक मार्ग आहेत. मुंबई-पणजी महामार्गावर महाड गांव आहे. महाड ते पाचाड असा २४ किमीचा मार्ग आहे. चित्त दरवाज्यातून पायऱ्यांच्या मार्गाने गडावर जाता येते. शिवरायांच्या राजधानीचा हा किल्ला आहे. दरवाजे, राजवाडा, मनोरे, राजसिंहासन, शिवरायांचे स्मारक अशा अनेक वास्तू गडावर आहेत. गडावर पाणी व निवासाची व्यवस्था उत्तम आहे. पाचाड येथे राजमाता जिजाऊंचे देखणे स्मारक आहे. अशा या ऐतिहासिक परपंरा असणाऱ्या किल्ल्यावर भारताचे महामहीम राष्ट्रपती रामनाथ कोविंद भेट देत आहेत. ही खूप मोठी ऐतिहासिक घटना ठरणार आहे.

किल्ले रागयड हा शिवकालापूर्वी रायगड म्हणून ओळखला जात नव्हता. तर त्यास म्हणत तणस, राशिवटा, नंदादीप, रायरी या बरोबरच उत्तमगड म्हणूनही रायगडाचा उल्लेख आला आहे. याचा प्राचीन इतिहास माहीत नसला तरी त्याचा फार पूर्वीपासून राहण्यासाठी उपयोग केला जात असावा. खूबलढा बुरुजाजवळील दोन छिद्राची गुहा आहे. ती थेट अश्मयुगीन. त्यास म्हणतात नाचणटेपाची गुहा किंवा गन्स ऑफ पाचाड असे म्हणतात.

इ.स.च्या बाराच्या शतकात या डोंगरावर एका मराठा पाळेगाराचे अधिपत्य होते व त्याही आधी येथे काही डोंगर कोळी राहत असत. पण ज्या वेळी म्हणजे चौदाव्या शतकात येथील मराठा पाळगोर विजयनगरच्या राज्याचा मांडलिक बनला त्या वेळी येथे एक चांगले चौकी-पहाऱ्याचे ठिकाण असावे व याच वेळी यास रायरी म्हणत असावेत. यानंतर अल्लाउद्दीन शहा बहमती याने इ.स. १४३६ च्या सुमाराहस येथील पाळेगारास आपले नोकर बनवून रायरीवर





आला हल्ला प्रस्थापित केला. पुढे बहमनी राज्याचे तुकडे झाल्यावर तहाप्रमाणे रायरी आदिलशहाकडे आला. रायरीचा जुना निजामशाही किल्लेदार शिर्के याने आदिलशहाचे अभिपत्य कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.

आदिलशहाचाच एक सरदार जावळीच्या चंद्रराव मोरे याने रायरीवर आपला हक्क प्रस्थापित केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचाली सुरू झाल्या. हिंदवी स्वराज्य वाढू लागले. अनेक मोठे प्रदेश महाराजांच्या ताब्यात आले, पण कळीचा चंद्रराव काही नमेना, उलट रयतेस त्याचा त्रासच होऊ लागला, मणून महाराजांनी त्यास सामोपचाराचे बोलणे लावले, तर चंद्रावाकडून उर्मट सवालच सुरू झाले. महाराज खवळले. त्यांनी जावळीवर छापा घातला, जावळी काबीज केली. खासा चंद्रराव घाबरून पळून जाऊन रायरीचा आश्रय घेता झाला. महाराजांनी रायरीस वेढा घातला. अखेर चंद्रराव नमला, शरण आला. रायरी स्वराज्यात आला. महाराजांनी गडाच्या दुरुस्तीचा हुकूम दिला आणि रायारीचा रायगड झाला.

शिवाजीमहाराजांनी राजापूरच्या इंग्रज वखारीवर इ.स. १६६१ च्या सुमारास स्वारी केली. त्याची योजना रायगडवर ठरली. पुढे मिर्झाराजेंची स्वारी आली त्या वेळी तहात ठरल्याप्रमाणे मोगलांना तेवीस किल्ले द्यावे लागले व बारा आपल्याकडे ठेवले. या बारा किल्ल्यात रायगड होता. म्हणजे रायगडचे महत्त्व महाराज ओळखून होते. शिवाजी महाराज व पोर्तुगीज यांच्या रायगडाववरच ११ डिसेंबर १६६७ या दिवशी तह झाला व तेथूनच रायगडचे राजकीय, लष्करी महत्त्व वाढू लागले.

रायगडासाठी इ.स. १६७२च्या सुमारास ५० होन खर्च केल्याचा उल्लेख आहे. हा बहुधा तटबंदी, तोफा ओतणे, इमारती बांधणे, गडाची डागडुजी करणे यासाठी असावा. मे १६७३ मध्ये इंग्रज प्रतिनिधी टॉमस निकल्स हा व्यापारी स्वरूपाच्या सवलती इंग्रजांना मिळण्यासाठी भेटला होता. निकल्सने रायगडाविषयी माहिती आपल्या रोजनिशीत, डायरीत लिहून ठेवली आहे. तो म्हणतो, अन्नाचा पुरवठा भरपूर असल्यास अल्प शिबंदीच्या सहाय्याने रायगड साऱ्या जगाविरुध्द लढू शकेल.

याच सुमारास म्हणजे १८ मार्च १६७४ या दिवशी रायगडवर महाराजांची राणी काशिबाईसाहेब निधन पावल्या. मे १६७४ मध्ये रायगडावर हंबीरराव मोहित्यांना महाराजांनी सरसेनापतीपद दिले. यानंतर रायगडच्या इतिहासातील सुवर्ण क्षण आला. ६ जून १६७४ या दिवशी महाराज रायगडवर सिंहासनाधिश्वर झाले. यानंतर केवळ अकराव्या दिवसांनी जिजाबाईंचा मृत्यू पाचाडच्या वाड्यात झाला. (१७ जून १६७४) या वैदिक राज्याभिषेकानंतर काही तंत्रमार्गी ब्राह्मणांच्या समाधानासाठी रायगडवरच महाराजांनी तांत्रिक पद्धतीचा राज्याभिषेक करवून घेतला. निश्चलपूरी गोसावी यांनी हा विधी केला. (२४ सप्टेंबर १६७४) राज्यभिषेकप्रसंगी महाराजांनी शिवराई हे नाणे व राज्यभिषेक शक सुरू केला.

राज्याभिषेकानंतर रायगडावरून महाराज दक्षिण दिग्विजयास निघाले. कर्नाटकची मोहीम यशस्वी करून मे १६७८ मध्ये महाराज रायगडवर परतले. राजारामांची मुंज ७ मार्च १६८० या दिवशी रायगडावर झाली व त्यानंतर १५ मार्च १६८० रोजी प्रतापराव गुजराच्या मुलीबरोबर राजारामाचे लग्नही रायगडावर झाले. याबद्दलची माहिती द. ग. देशपांडे यांच्या महाराष्ट्रातील किल्ले यात नमूद केली आहे. तर प्रमोद मांडे यांच्या गडकिल्ले पुस्तकातही माहिती उपलब्ध आहे.

गेल्या काही वर्षापासून केंद्र आणि राज्य शासनाच्या मदतीने रायगड किल्ला संवर्धनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. रायगड किल्ल्यावर विविध सोयीसुविधा, देखभाल, प्राथमिक दुरुस्ती आणि पर्यटकांना जाण्यासाठी रस्ते तयार होत आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि पुरातत्त्व विभाग या किल्ल्यांसाठी विशेष योजना राबवित आहे. भारताचे राष्ट्रपती यांची रायगड किल्ल्यावरील भेट म्हणूनच आगामी काळात खूप महत्त्वाची ठरणार आहे.

**-विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई**

# दुसऱ्या कसोटीवर भारताची मजबूत पकड

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताने मुंबईत खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटीवर आपली मजबूत पकड निर्माण केली आहे. भारताने दुसरा डाव ७ बाद २७६ धावांवर घोषित करून ५३९ धावांची भक्कम आघाडी घेतली. त्यानंतर न्यूझीलंड संघाची दुसऱ्या डावातही घसरगुंडी उडाली. रविचंद्रन अश्विनने सुरुवातीलाच तीन धक्के देत 'किवीं'ना बॅकफूटवर फेकले. हेन्री निकोल्स व डॅरील मिचेल यांच्या ७३ धावांच्या भागीदारीने न्यूझीलंडचा पराभव चौथ्या दिवसावर ढकलला, पण दिवसअखेर त्यांचा निम्मा संघ माघारी परतला आहे.

कसोटीच्या दुसऱ्या दिवशी झेल घेण्याच्या प्रयत्नात शुबमन गिलने बोटाला दुखापत करून घेतली आणि त्यामुळे चेतेश्वर पुजारा व मयांक अग्रवाल ही जोडी सलामीला आली. भारताने फॉलऑन न देता पुन्हा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पुजारा व मयांक यांनी पहिल्या विकेटसाठी १०७ धावांची भागीदारी केली. त्यानंतर पुजारा ४७ धावांवर बाद झाला. शुमबनला पुन्हा अर्धशतकाने हुलकावणी दिली. तो ४७ धावांवर माघारी परतला.





मयांक ६२ धावा करून तर त्यानंतर कर्णधार विराट कोहली ३६ धावा करून बाद झाला. अक्षर पटेलने २६ चेंडूंत तीन चौकार व चार षटकार खेचून नाबाद ४१ धावांची खेळी केली. न्यूझीलंडकडून एजाज पटेलने १०६ धावा देताना चार विकेट्स घेतल्या. राचिन रवींद्रने तीन बळी टिपत त्याला चांगली साथ दिली.

न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक राहिली. टॉम लॅथम अवघ्या ६ धावांवर बाद झाला. अश्विनने त्याची विकेट घेतली. टी ब्रेकनंतर अश्विनने 'किवीं'ना आणखी दोन धक्के दिले. विल यंग (२०) व रॉस टेलर (६) यांना माघारी पाठवून अश्विनने २०२१मध्ये कसोटीत ५०+ विकेट्स पूर्ण केल्या. कॅलेंडर वर्षात सर्वाधिक चार वेळा ५०+ कसोटी विकेट्स घेण्याचा विक्रमही अश्विनच्या नावावर झाला. त्याने अनिल कुंबळे (१९९९, २००४ व २००६) आणि हरभजन सिंग ( २००१, २००२ व २००८) यांचा विक्रम मोडला.

हेन्री निकोल्स व डॅरील मिचेल यांनी भारतीय गोलंदाजांचा चांगला सामना केला. मिचेलने वैयक्तिक अर्धशतकासह निकोल्सह अर्धशतकी भागीदारी केली. या दोघांची ७३ धावांची भागीदारी अक्षर पटेलने तोडली. डॅरील मिचेलला ६० धावांवर माघारी जावे लागले. त्यानंतर आलेल्या टॉम ब्लंडलने घाई केली आणि त्यालाही भोपळ्यावर धावबाद होऊन माघारी जावे लागले. न्यूझीलंडने तिसऱ्या दिवसअखेर ५ बाद १४० धावा केल्या आहेत आणि त्यांना विजयासाठी दोन दिवसांत ४०० धावा बनवायच्या आहेत, तर भारताला मालिका खिशात घालण्यासाठी ५ विकेट्स हव्या आहेत.

## आरोग्य प्रहर



### भोपळ्याच्या बिया आरोग्यासाठी फायदेशीर

भोपळा खाणे जेवढे स्वादिष्ट आहे, तेवढेच ते आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. भोपळ्यामध्ये असलेले बीटा कॅरोटीन तुमच्या शरीरातील फ्री रॅडिकल्सशी लढण्यास मदत करते. भोपळ्याच्या बियांमध्ये अनेक सेंद्रिय रसायने आणि पोषक तत्त्वे आढळतात. भोपळ्यासोबतच त्याच्या बियादेखील खूप फायदेशीर आहेत, चला जाणून घेऊया याचे फायदे.

या बियामध्ये भरपूर जीवनसत्त्वे असतात भोपळा बीटा कॅरोटीन व्यतिरिक्त व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी १, बी २, बी ६, व्हिटॅमिन सी आणि ईचा एक चांगला स्त्रोत आहे. भोपळ्यामध्ये तांबे, लोह आणि फॉस्फरस देखील असतात, त्यामुळे भोपळा आरोग्यासाठी खूप पौष्टिक आहे, पण तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, फक्त भोपळाच नाही तर त्याच्या बियादेखील तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. भोपळ्याच्या बियांमध्ये अनेक पोषक आणि रसायने असतात, जी तुमच्या आरोग्यासाठी चांगली असतात.


भोपळ्याच्या बियांमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स भरपूर असतात. जे रक्तदाब पातळी कमी करण्यास मदत करतात. जर तुम्हाला कमी रक्तदाबाचा आजार असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच त्याचे सेवन करावे. भोपळ्यामध्ये भरपूर फायबर असते.

भोपळ्याच्या बिया हृदयाशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. जर तुम्ही दररोज सुमारे दोन ग्रॅम भोपळ्याच्या बियांचे सेवन केले, तर तुम्हाला फायदा होतो. भोपळ्यामध्ये फायबर, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. पोटॅशियमच्या सेवनाने हृदयविकाराचा धोका कमी होतो.

डॉक्टरांच्या मते, सांधेदुखीच्या रुग्णांसाठी भोपळ्याच्या बियांचे सेवन फायदेशीर मानले जाते. भोपळ्याच्या बिया नैसर्गिक औषधी वनस्पती म्हणून वापरल्या जाऊ शकतात. याचा तुमच्या शरीरावर कोणताही नकारात्मक परिणाम होत नाही. भोपळ्याच्या बियांचे सेवन केल्याने शरीरातील रक्त आणि ऊर्जेची पातळी योग्य प्रकारे विकसित होते.

## सिंधूच्या पदरी पुन्हा निराशा

**बीडब्लूएफ स्पर्धेच्या अंतिम फेरीत पराभव**



**बाली : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिकमध्ये देशासाठी दोन पदकांची कमाई करणाऱ्या सिंधूला बीडब्लूएफ जागतिक बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. या स्पर्धेत दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवण्याचे तिचे स्वप्न अधुरेच राहिले आहे.

तिसऱ्यांदा या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करणाऱ्या सिंधूला दक्षिण कोरियाच्या न सियोंगचे हिने २१-१६ २१-१२ असे सरळ सेटमध्ये पराभूत केले. डेन्मार्क ओपन स्पर्धेतही सिंधूला तिनेच पराभूत केले होते.

यापूर्वी २०१८ मध्ये या स्पर्धेचे जेतेपद पटकावणारी सिंधू एकमेव भारतीय बॅडमिंटनपटू आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदकाची कमाई केल्यामुळे यंदाच्या स्पर्धेत तिच्याकडून जेतेपदाची आस होती, पण द. कोरियाच्या अव्वल न सियोंगने पुन्हा एकदा सिंधूला हरविले.





## माणगाव प्रीमियर लीगचे उद्‌घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे तीन दिवस लांबणीवर पडलेल्या माणगाव प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला शनिवारी (दि. ४) सुरुवात झाली. या स्पर्धेचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे माजी सभापती अ‍ॅड. राजीव साबळे यांच्या हस्ते व माजी सभापती ज्ञानदेव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

माणगाव निळगुण फाटा येथे अल्ताफ धनसे यांच्या भव्य मैदानावर ही स्पर्धा सुरू झाली असून ती पाच दिवस चालणार आहे. १६ संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. विजेत्यांना प्रथम क्रमांक ५५,५५५ रुपये, द्वितीय ३३,३३३ रु., तृतीय व चतुर्थ प्रत्येकी २२,२२२ रु. आणि चारही विजेत्यांना आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. वैयक्तिक बक्षिसांमध्ये मालिकावीरासाठी सायकल, उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाज यांना एलईडी टीव्ही, सामनावीर चषक यांचा समावेश आहे.

स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभास जिल्हाध्यक्ष अनिल नवगणे, माजी नगरसेवक सचिन बोंबले, कपिल गायकवाड, दिनेश रातवडकर, सुनील पवार, विरेश येरुणकर, स्वप्नील सकपाळ, लीगचे अध्यक्ष मंगू जाधव, माणगाव असोसिएशनचे अध्यक्ष फहद करबेलकर, भाई दसवते, निलेश उभारे, राहुल बक्कम आदी उपस्थित होते.

## पहिल्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलिया संघाची घोषणा

**प्रतिष्ठेची अ‍ॅशेस मालिका**

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील बहुप्रतिक्षित अ‍ॅशेल मालिका ऑस्ट्रेलियाच्या मैदानात रंगणार आहे. ८ डिसेंबरपासून ब्रिस्बेनच्या गाबा मैदानातून या मालिकेला सुरुवात होईल. पहिल्या कसोटी सामन्यासाठी तीन दिवस बाकी असताना ऑस्ट्रेलियाने आपल्या संघाची घोषणा केली आहे. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियन संघ पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरणार आहे.

पॅट कमिन्सने संघात सहा फलंदाजांना स्थान देण्याला पसंती दिलीये. यात सलामीवीर मार्कस हॅरिस आणि डेव्हिड वॉर्नर यांचा समावेश आहे. मार्नस लाबुशेन, स्टीव्ह स्मिथ, ट्रेविस हेड आणि यष्टीरक्षक फलंदाज एलेक्स कॅरी यांच्यावर कर्णधाराने विश्वास दाखवलाय. जलदगती अष्टपैलू गोलंदाज म्हणून ऑस्ट्रेलियाने कॅमरून ग्रीनला संधी दिलीये. संघात एकूण चार प्रमुख गोलंदाज आहेत.

**ऑस्ट्रेलियन प्लेइंग इलेव्हन**

मार्कस हॅरिस, डेव्हिड वॉर्नर, मार्नस लाबुशेन, स्टीव्ह स्मिथ, ट्रेविस हेड, एलेक्स कॅरी (यष्टीरक्षक), कॅमरून ग्रीन, पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क, नॅथन लायन आणि जोश हेजलवूड.





**मालिकेचे वेळापत्रक**

पहिला कसोटी सामना : ८-१२ डिसेंबर, गाबा
दुसरा कसोटी सामना : १६-२० डिसेंबर, एडिलेड
तिसरा कसोटी सामना: २६-३० डिसेंबर, मेलबर्न
चौथा कसोटी सामना : ५-९ जानेवारी, सिडनी
पाचवा कसोटी सामना : १४-१८ जानेवारी, पर्थ

## नीरज चोप्रा बनला चिमुकल्यांचा प्रशिक्षक

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

टोकियो ऑलिम्पिकमध्ये भालाफेक या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक पटकावून इतिहास घडवणाऱ्या नीरज चोप्राने पुन्हा एकदा अनेकांची मने जिंकली आहेत. नीरज नुकताच अहमदाबादमधील एका शाळेत गेला होता. तिथे त्याने शाळकरी मुलांसोबत काही वेळ घालवला, त्यांच्याशी बातचित केली. त्याचबरोबर त्यांना भालाफेक शिकवली. नीरजने त्यांना खेळ व आरोग्यसंदर्भात मार्गदर्शनही केले.

नीरज चोप्राचा या भेटीदरम्यानचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर शेअर केला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही हा व्हिडीओ शेअर करीत नीरजचे कौतुक केले आहे. मुलांमध्ये जाऊन त्यांना खेळ आणि आरोग्यप्रती जागृत करणे हे खूप चांगले काम नीरज करीत आहे. आपणही ही मोहीम पुढे अशीच चालू ठेवूया आणि मुलांना, युवकांना खेळण्यासाठी प्रेरित करूया, असे पंतप्रधानांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे.

## अबूधाबी टी-१० लीगचा डेक्कन ग्लेडिएटर्स संघ विजेता

**'मसल पॉवर' रसेलचा धमाका**

**अबूधाबी : वृत्तसंस्था**

डेक्कन ग्लेडिएटर्सने अबूधाबी टी-१० लीगच्या पाचव्या हंगामाचे विजेतेपद पटकावले आहे. ग्लेडिएटर्स आणि दिल्ली बुल्स यांच्यात शनिवारी अंतिम सामना रंगला होता. यात ग्लेडिएटर्सनं ५६ धावांनी विजय नोंदवत जेतेपदावर नाव कोरले. डेक्कन ग्लेडिएटर्सच्या विजयात कॅरेबियन अष्टपैलू आंद्रे रसेलने मोलाचा वाटा उचलला. मसल पॉवर रसेलने ३२ चेंडूंत ९० धावांची धमाकेदार खेळी केली.



नाणेफेक गमावल्यानंतर पहिल्यांदा फलंदाज करताना डेक्कन ग्लेडिएटर्सने १० षटकांत एकही विकेट न गमावता १५९ धावा केल्या होत्या. यात आंद्रे रसेलने ३२ चेंडूंत नऊ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने नाबाद ९० धावा कुटल्या. दुसऱ्या बाजूला इंग्लिश फलंदाज टॉम कोहलर-कॅडमोरने २८ चेंडूंत पालच षटकार आणि तीन चौकारांच्या मदतीने ५९ धावांची नाबाद खेळी केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी केलेली १५९ धावांची भागीदारीसह रसेल आणि कॅडमोर जोडीने टी-१० लीगच्या इतिहासात नवा विक्रम प्रस्थापित केला. त्यांनी केलेली धावसंख्या ही टी-१० लीगमधील सर्वांत मोठी भागीदारी ठरली आहे.

या धावांचा पाठलाग करताना दिल्ली बुल्स संघाला निर्धारित १० षटकांत सात बाद १०३ धावांपर्यंतच मजल मारता आली. चंद्रपॉल हेमराजने २० चेंडूंत पाच षटकार आणि दोन चौकाराच्या मदतीने ४२ धावा केल्या.







**उलवे नोड :** चहाप्रेमींसाठी संतोष दास आणि शंपा दास यांनी सेक्टर १९ येथे श्री गुरुदत्त चहा नावाने व्यवसाय सुरू केला आहे. या दुकानाचे उद्‌घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजप नेते अजय भगत, जगताप साहे, सामाजिक कार्यकर्ते राजन गावडे, प्रवीण म्हसके, गुरुदत्त चहा कंपनीचे फाऊंडर नित्यानंद जोशी, संदिल जोशी आदी उपस्थित होते. उलवे नोडचा चारही बाजूने विस्तार होत असून या परिसरात अनेक उद्योग सुरू होत आहेत. विमानतळ जवळ असल्याने या भागाचे महत्त्व वाढत आहे. या पार्श्वभूमीवर जोशी यांनी जो चहाचा व्यवसाय सुरू केला आहे तो नक्कीच ग्राहकांना समाधान देईल, असे सांगत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या व्यवसायाच्या यशस्वी वाटचालीसाठी जोशी यांना शुभेच्छा दिल्या.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com